आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, ३ जून २०२३



**स्व.गोपीनाथराव मुंडे यांची आज (3 जून) पुण्यतिथी. खरं पाहता त्यांच्या बाबतीत जयंती म्हणा किंवा पुण्यतिथी हे शब्द उच्चारण देखील सर्वांना जड जातं. मात्र वर्षातले हे दोन दिवस आले की, महाराष्ट्रातील अठरापगड जातीधर्माचे लोक त्यांच्या आठवणीने व्याकुळ होतात. कारण साहेब अकाली गेल्याचं रूखरूख डोळ्यातल्या आश्रुला वाट मोकळी करून देतं. मग त्यांच्या असंख्य आठवणी त्यांचा तो दिलखुलास चेहरा, धिप्पाड शरीरयष्टी, डोळ्यातला चष्मा, अंगातलं जॅकीट अन खिश्यातला कंगवा काढत विंचरलेले केस. सारेच सारे प्रसंग डोळ्यासमोर प्रत्येकाच्या उभा रहातात.**

वर्तमान राजकारणात म्हणा किंवा भविष्यात असा राजकारणी चेहरा पहायला मिळणार नाही. कुठलाही ताणतणाव न घेता जनकल्याणासाठी आयुष्य समर्पण ज्यांनी केलं त्यांच्या आठवणी प्रत्येकाच्या ऱ्हदयात घर करून बसलेल्या म्हणुनच नेहमीच असं वाटतं की साहेब पुन्हा जन्माला येणार का ? आज असते तर पंच्याहत्तरी साजरी झाली असती. सहस्त्रचंद्र दर्शन सोहळाही साजरा झाला असता. बाकी काही असलं तरी असंख्य आठवणीनं प्रत्येकाचं ऱ्हदय पिळल्या जाईल त्यात दुःखाच्या झरा पाझरून मनोभावे साहेबांना विनम्र अभिवादन होईल हे मात्र नक्की. मरणोत्तर माणसाच्या आठवणी एवढ्याच शिल्लक रहातात पण दिवसागणिक पुन्हा पुन्हा त्याला उजाळा भेटतो. त्यातही ज्यांचं कर्तृत्व अगदी पर्वताएवढं मोठं असतं अशांच्या सावलीखाली बसलेले अनुयायी ज्यांना विसर कधी पडत नाही. शेवटी पुण्यतिथी, जयंती जेव्हा साजरी होते त्या निमित्ताने प्रत्येकाच्या मनातल्या आठवणीला उजाळा मिळतो. स्व.गोपीनाथराव मुंडे यांची आज पुण्यतिथी साजरी होताना तब्बल आठ वर्षे कशी गेली ? हे कळत नाही. सुर्य उगवतो, मावळतो. पण मधलं अंतर पार कधी होतं ? तसंच काही साहेब गेल्याची उणिव भासते पण ते नाहीत यावर अजुनही विश्वास बसत नाही. गोपीनाथरावजी महाराष्ट्राच्या राजकिय धबडग्यातलं एक असं नेतृत्व ज्यांच्या भोवती तब्बल पंचेवीस ते तीस वर्षे महाराष्ट्राचं राजकारण फिरत होतं. वास्तविक पहाता या माणसाने शुन्यातुन विश्व निर्माण केलं. स्वतःचा विचार त्याहुन अधिक विशिष्ट तत्वज्ञानाने राजकिय वर्तुळात प्रवेश केल्यानंतर तत्कालीन काळात प्रस्थापितांच्या विरोधात संघर्ष करताना ज्यांनी आयुष्यात सत्ता भोगण्यापेक्षा संघर्षाचा काळ अधिक पाहिला. हे झालं म्हणून समाजातील वंचित, उपेक्षित,दीन दुबळे, गरिब, शेतकरी, कष्टकरी यांच्या जीवनातलं दुःख त्यांनी वेचलं. लोकांच्या कल्याणासाठी आयुष्यातली प्रत्येक रात्र जागताना या माणसाने भारतीय जनता पार्टीला वैभव मिळवुन दिलं हे सत्य कुणी नाकारू शकत नाही. 1980 नंतर 1992-93 पर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अगदीच म्हटलं तर ग्रामीण भागात खेडेपाडी, वस्ती, तांडे पक्षाची पताका खांद्यावर घेवुन जनमाणसात पक्षाचं स्थान मिळवुन देण्यात त्यांना यश आलं. समाजकारण आणि लोकसंग्रह यात त्यांची आग्रही भुमिका असायची. राजकारण करताना केवळ विजयासाठी नव्हे तर लोकशाहीच्या मार्गाने आपण मतदारांची मनं जिंकु आणि लोकांची सेवा करू हा त्यांचा दृढ भाव होता. अगदीच म्हटलं तर शरदचंद्रजी पवार यांच्या राजकिय अस्तित्वाला खऱ्या अर्थाने सुरूंग लावण्याचे काम महाराष्ट्रात कुणी केलं असेल तर गोपीनाथरावचं नाव नेहमीच पुढे राहिलं. माणसासाठी जगलं पाहिजे. या भुमिकेत त्यांनी भ्रष्टाचाराच्या विरोधातही लढे दिले. अनेक भुमिकेत त्यांनी काम केले. पक्षाचा अध्यक्ष, आमदार, विरोधी पक्ष नेता, राज्याचे उपमुख्यमंत्री, खासदार, अन् काही तासाचे केंद्रिय मंत्री विद्यार्थी दशेत देखील विद्यापीठ स्तरावर प्रतिनिधित्व करताना अभाविप संघटनेला बळकटी त्यांनी दिली. तो काळ स्व.प्रमोद महाजन यांच्या सहवासातला होता. भाजयुमोच्या माध्यमातुन युवकांचं नेतृत्व तत्कालीन काळात केलं. महाजन-मुंडे ही जोडी एकेकाळी राजकारणाच्या मध्यभागी होती. सर्व राजकिय भुमिका त्यांनी सक्षमपणे पार पाडल्या. विरोधी पक्ष नेता कसा असावा ? तर मग राज्याचा गृहमंत्री या नात्याने मुंबईतल्या गुन्हेगारी जगातलं कंबरडं मोडलं तर दुसऱ्या बाजुने जातीय दंगली आटोक्यात आणल्या. कर्तव्यदक्ष गृहमंत्री महाराष्ट्रातील जनतेने पाहिलं. देशाच्या राजकारणात जाण्याची संधी 2009 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना जेव्हा आली तेव्हा मतदारसंघ त्यांनी बीड निवडला. कारण माझा जिल्हा-माझी माणसं आणि माझी कर्मभुमी हा आदर त्यांच्या मनात लहानपणापासूनच होता. जिल्ह्याचं राजकारण वेगवेगळ्या रंगाढंगात जायचं पण गोपीनाथराव म्हटलं की प्रचंड मतदान मिळायचं. अगदी तत्कालीन काळात राष्ट्रवादी पक्षाच्या नेत्यांनी बीड जिल्ह्यात पराभव करण्यासाठी सर्व ताकद पणाला लावली. 2014च्या निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाने जिल्ह्याच्या राजकारणात केलेले प्रयोग अत्यंत राजकियदृष्ट्या विषारी होते पण हे नेतृत्व आपल्यासाठी अमृतकाळ असल्याचं जिल्ह्यातील मतदारांच्या लक्षात आलं होतं. ज्या निवडणुकीची भिती स्वतः गोपीनाथरावांना वाटली त्या 2014च्या निवडणुकीतसुद्धा मोठ्या मताच्या फरकाने ते निवडुन आले. 1995 ला राज्यात सेना-भाजपचं सरकार जेव्हा आलं होतं त्यात मुंडे साहेबांची भुमिका सरकार आणण्यासाठी अत्यंत महत्वाची राहिली. मुळात या माणसाला जनसंपर्काचा छंद होता. लोकांच्या गर्दीची आवड होती. महाराष्ट्राचं राजकारण करताना वैचारिक संस्कृती सुसंस्कृत ठेवण्यासाठी त्यांनी दाखवुन दिलेले आदर्श वर्तमान युवक राजकारणी मंडळींनी घेण्यासारखे म्हणावेत. शरदचंद्र पवार यांना राजकिय विरोध केला तरी त्यांच्या घराण्याशी चांगली मैत्री होती. स्व. बाळासाहेब ठाकरे, स्व.विखे पाटील अगदी म्हटलं तर सोलापुरचे मोहिते घराणे सर्व प्रस्थापितांच्या सोबत राजकिय संघर्ष केला पण स्नेह संबंध चांगले ठेवले. ऊसतोड कामगारांच्यासाठी त्यांनी दिलेला लढा रस्त्यावरचा होता. कोयत्याला सन्मान आणि आर्थिक सुबत्ता त्यांच्यामुळेच मिळाली. कधी कधी काय वाटायचं कळतचं नव्हतं. कारण त्यांचं दुःख वेचणं आणि सेवा करणं हा स्थायी स्वभाव होता. त्यांचं राजकारण खिलाडु वृत्तीचं होतं. छगन भुजबळांच्या निवासस्थानी अचानक जायचे तर रामदास आठवलेंना प्रत्यक्ष भेटुन चर्चा करायचे. अर्थात ओबीसी जनसंघटन करण्यासाठी देखील त्यांनी केलेला संघर्ष नजरेआड करता येणार नाही.
एखाद्याला जवळ केलं की न्याय मिळवुन देण्याची ताकद आणि स्वभाव त्यांचा मुळ होता. महाराष्ट्रातल्या सर्व मातब्बर राजकिय घराण्याला त्यांच्या राजकिय मदतीचा हातभार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लागलेलाच म्हणावा लागेल. बाहेरचे जाऊ द्या. बीड जिल्ह्याच्या बाबतीत बोलायचं झालं तर साहेबांनी तब्बल तीस वर्षे एकतर्फी जिल्ह्याचं नेतृत्व केलं. राजकारण करताना वजाबाकी त्यांनी न करता केवळ बेरजेचं राजकारण केलं. जिल्ह्यात अनेक प्रस्थापित पुढारी जेव्हा राजकिय दुकानं बंद पडली तेव्हा पुन्हा दुकान चालु करण्याचं काम अनेकांच्या कुटुंबात केवळ साहेबांमुळे झालं. अलीकडच्या काळात गोपीनाथराव म्हणजे आमदार, खासदार बनवणारा कारखाना. एकदा खांद्यावर हात पडला की माणुस मोठा झाला असं अगदी समीकरणच बनलं होतं. मुळात संघर्षवादी भुमिका घेणारं हे नेतृत्व होतं. दिलखुलास राजकारण करणं त्यांना पसंत असायचं.आपल्याला शिव्या घालणाऱ्याला त्यांनी शत्रु कधीच मानलं नाही. म्हणुन अखेरपर्यंत राज्यातील, देशातील विरोधक देखील त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक करायचे. स्व.बाबुरावजी आडसकर तत्कालीन काळात मुंडे साहेबांच्या विरोधात होते पण आपल्या जिल्ह्याचं सुपुत्र देशाच्या पातळीवर नेतृत्व करतंय या स्वाभिमानापोटी अनेकदा बाबुरावांनी मुंडे साहेबांच्या नेतृत्वाचं कौतुक केलं. राजकारणात होत्याचं नव्हतं आणि नव्हत्याचं होतं करून दाखवण्याची ताकद म्हणजे मुंडे साहेब. उदा.जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत सभागृहात जाताना भाजपाची सदस्य संख्या विजय मिळवण्याएवढी नव्हती पण प्रत्यक्षात भाजपला विजय मिळाला विरोधक तोंडावर पडले असे राजकिय चमत्कार त्यांनी जिल्ह्याच्या राजकारणात अनेकदा केले. तसं पाहता हे नेतृत्व जिल्ह्यात संपवण्यासाठी मोठ्या मोठ्या मातब्बर पुढाऱ्यांनी सर्व शक्ती पणाला लावली. तरी पण या वाघाने थांगपत्ता कुणाला लागु दिला नाही. एक विचार केला तर निश्चितच दैवी शक्ती प्राप्त ज्याला रिद्धी-सिद्धी असं म्हणु असेही नेतृत्व होतं. एखादी निवडणुक वर बाजुने अशी रंगात यायची जणु काही गोपीनाथरावांचा पराभव झाला पण मतदान मोजल्यानंतर जेव्हा प्रचंड मताने विजय मिळायचा ते गणित कुणाच्या लक्षात यायचं नाही. कारण राजकारण करताना सर्वसामान्य माणसासोबत थेट जनसंपर्क आणि नाळ जोडण्याचं काम त्यांनी केलं म्हणुन मतदार हा सुरक्षा कवच बनुन त्यांच्या बाजुने उभा रहायचा. आजचा दिवस आठवणीशिवाय दुसरं काही असुच शकत नाही. अगदीच प्राणाचा त्याग केला तरी साहेब पुन्हा परत येणार नाहीत. पण त्यांच्या असंख्य




# तो एक राजबिंडा

आठवणी याच प्रत्येकाला घायाळ करून टाकतात. लोहचुंबकीय ताकद त्यांच्या नेतृत्वात होती. खरं म्हणजे प्रत्येकजणच साहेबाविषयी सारखंच बोलु शकतो. ज्याला सहवास मिळाला,ज्याच्या पाठीवर थाप पडली त्याचा उद्धार झाला असा काळ साहेबांचा लोकांनी पाहिला. शब्द देणारा नेता आणि दिलेला शब्द पाळणारा माणुस डबल ढोलकी बदडण्याचं काम राजकारणात त्यांनी कधीच केलं नाही. असो. प्रत्येकाचं मन अगदी आज हेलावुन टाकणारं असतं. गल्ली ते दिल्ली या नेत्याने काळ गाजवलेला आहे. स्व.अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण आडवाणी आणि वर्तमान स्थितीत देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संगतीत सहवासित शिवाय राज्यभरातील असंख्य नेत्यांच्या सोबतीत आणि सहवासित राहिलेले हे नेतृत्व ज्यांची किमाया साता समुद्रापार गेली तरी कुणालाच कळणार नाही. साहेबांच्या मनात काय चाललं ? याचा अंदाज कधीही कुणाला घेता आला नाही. पण त्यांचे निर्णय अचुक असतात हे सत्यवादी चित्र सर्वांनीच डोळ्यांनी पाहिलं. सहवासित लोक जेव्हा गोपीनाथ गडावर नतमस्तक व्हायला येतात तेव्हा प्रत्येकाच्या मनाला आपल्या कुटुंबातील झालेलं नुकसान कधीच भरून काढु शकत नाहीत. हा ठायी भाव चेहऱ्यावर असतो. पंकजाताई, प्रितमताई या लेकरांनी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत सुरू केलेली राजकिय वाटचाल समाज कल्याणाच्या दृष्टीने उपयुक्त म्हणावी लागेल. पण एक गोष्ट तितकीच खरी जो संघर्ष साहेबांनी केला तोच संघर्षाचा वारसाही लेकीच्या नशिबाला असं म्हणायला हरकत काय ? पण वाघाचं पिल्लु वाघ असतं. एक दिवस तो वाघ झेप घेतल्याशिवाय रहात नाही. आकाशात उडणाऱ्या पाखराचं पंखात बळ असतं. तसं राजकारणात उडणाऱ्या माणसाच्या अंगी कर्तृत्वाचं असलेले बळ सुख दुःखाचे डोंगरं पार करून यशाकडे घेवुन गेल्याशिवाय रहात नाही. साहेबांना पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी अभिवादन. तुम्ही आमच्यात नाहीत. पण ऱ्हदयात नक्कीच आहात. माधीस्थळावर नतमस्तक झालं की जगण्यासाठी नवी ऊर्जा, प्रेरणा मिळते हे मात्र नक्की.



राम कुलकर्णी, भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क : 9422742577




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

निसर्ग देवाने दिलेली अत्यंत सुंदर देणगी आहे. निसर्गामध्ये हवा ,पाणी, वृक्ष यांचा समावेश होतो. नैसर्गिक, भौतिक किंवा भौतिक जग किंवा विश्वाचा व्यापक अर्थ आहे. निसर्ग भौतिक जगाची घटना आणि सामान्यतः जीवनाशी संबंधित आहे. नैसर्गिक अभ्यासाचा एक मोठा भाग नसतो तर विज्ञानांचा एक भाग असतो. जरी मानव निसर्गाचा भाग असत, तरी मानवी क्रियाकलाप इतर नैसर्गिक घटनांपासून वेगळ्या श्रेणी म्हणून समजली जाते. निसर्ग शब्द लॅटिन शब्द नतुरा, किंवा आवश्यक गुणधर्म, जन्मजात स्वभाव पासून प्राप्त झाला आहे आणि प्राचीन काळात शाब्दिक अर्थ जन्म असा होतो. Natura ग्रीक शब्द फिजिसचा एक लॅटिन अनुवाद आहे, जो मूळतः वनस्पती, प्राणी आणि इतर वैशिष्ट्यांसह अंतर्गत मूलभूत वैशिष्ट्यांशी संबंधित आहे. निसर्गाची संकल्पना, संपूर्ण भौतिक विश्वाची मूळ कल्पना ही अनेक कल्पनांपैकी एक आहे; हे - शब्दाच्या काही मूलभूत अनुप्रयोगांसह प्रारंभिक-तत्त्वज्ञानी तत्त्वज्ञानींनी सुरू केले आणि त्यानंतरपासूनच चलन प्राप्त केले आहे. गेल्या काही शतकांमध्ये आधुनिक वैज्ञानिक पद्धतीच्या प्रारंभामध्ये हा उपयोग चालू राहिला. आजच्या शब्दांच्या विविध उपयोगांमध्ये, निसर्ग सहसा भूगर्भ आणि वन्यजीव याचा संदर्भ देते. निसर्ग जिवंत वनस्पती आणि प्राण्यांचे सामान्य क्षेत्र आणि काही प्रकरणांमध्ये निर्जीव वस्तूंशी संबंधित प्रक्रियांचा संदर्भ घेऊ शकतो - विशिष्ट प्रकारच्या गोष्टी अस्तित्वात असतात आणि पृथ्वीच्या हवामान आणि भूगर्भशास्त्र यासारख्या गोष्टी त्यांच्या स्वतःच्या बदलानुसार बदलतात. नैसर्गिक पर्यावरण किंवा वाळवंटातील जंगली प्राणी, खडक, जंगल आणि सर्वसाधारणपणे त्या गोष्टी ज्या मानवी हस्तक्षेपाने मोठ्या प्रमाणात बदलल्या नाहीत किंवा मानवी हस्तक्षेपानंतरही टिकत नाहीत. उदाहरणार्थ, उत्पादित वस्तू आणि मानवी परस्पर सहसा निसर्गाचा भाग मानले जात नाहीत, जसे की, मानवी स्वभाव किंवा संपूर्ण निसर्ग म्हणून पात्र नाही. नैसर्गिक वस्तूंच्या या अधिक परंपरागत संकल्पना आजही आढळतात ज्यात मानवी चेतनेमुळे किंवा मानवी मनामुळे कृत्रिम समजले जाणारे कृत्रिम आणि कृत्रिम दरम्यानचे फरक सूचित होते.

विशिष्ट संदर्भावर आधारित, नैसर्गिक शब्द देखील अप्राकृतिक किंवा अलौकिक शक्तीपासून वेगळे केला जाऊ शकतो.निसर्ग म्हणजे नेमके काय ? यात एकूणच जैविक अजैविक घटक मिळून तयार होणारी परिसंस्था. यात प्राणी, मानव, झाडे,नदी,पर्वत एकूणच प्रत्येक घटक हा एकमेकांवर अवलंबून असतो.






## आनंदी पहाट

## सौंदर्याचा साक्षात्कार मन मोठं केल्यावरच घडतो

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपले अंतर्बाह्य व्यक्तिमत्व कसे असू शकेल, हे ठरते. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौंदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते. आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण अनुभवताना, त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणे आवश्यक असते. आपली,

आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपापल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते. आपली सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकेच सुंदर सजवायचे, खुलवायचे असते. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारे मन मात्र मोठे असावे लागते. आपल्या छोट्या प्रतीमेतूनच मोठ्या मनाने सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो, त्यातच जीवनातले सार सामावलेले असते. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो.



आधुनिक केसरी

**बांधले काळाला | शब्दामृते ||**
असे हितकारी | बोल तो बोलवा ||
अमृताते तोलावा | ज्ञानासम ||१||
आनंदे वाटतो | शब्द धन ज्याचे ||
धन्य बोल त्याचे | तुकासम ||२||
संसारी नांदते | ज्ञानेश्वरी-गाथा ||
तिथे कैसी व्यथा | वास करी ? ||३||
अद्वैत जयाचा | आचार विचार ||
तेथे सदाचार | वास करी ||४||
राग-लोभ सारा | विरूनिया गेला ||
एकरूप झाला | शब्दानंदे ||५||
ईह-परलोकी | धन्य तोचि झाला ||
बांधले काळाला | शब्दामृते ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

हरिद्राकुंकुम
सौभाग्यद्रव्यभालसुशोभिताम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| १२ || जिचा भाल प्रदेश हळदी, कुंकुम
आदि सौभाग्यद्रव्यांनी शोभून दिसतो,
अशा दुर्गा देवीला तीनही तापांच्या
शांतीसाठी मी नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जीवन कर्म विचित्र है,
तेंव विचित्र संसार ।
भेद विभाग अनन्त है, सो सब कर्म अधार
।।४८।।(द्वितीय मण्डल षष्ठ अध्याय)
०२/०६/४८

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
जीवांच्या विचित्र कर्मांमुळेच संसार विचित्र आहे तसेच त्याचे अनेक भेद-विभाग आहेत. त्या सर्वांचे कारण कर्म आहे. कर्मांच्या विभिन्नतेमुळेच सृष्टी विचित्र आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी



त्यासाठी दासबोधाचा अभ्यास करावा. लहानपणी ही सवय लावून घेतली पाहिजे.
आतापर्यंत केलेल्या विवेचनात माझ्या प्रिय वाचकांच्या मनात आले असेल की मूळ परमात्म स्वरूप पहाण्यास अतिंद्रिय दृष्टी पाहिजे. आपली इंद्रिये इतकी दुर्बल आहेत की द्र्युष्य वस्तूंचे अंत रंग तर राहोच पण त्यांचे बहिरंग देखील इंद्रियांनी आपणास धड आकलन होत नाही. द्रुष्य वस्तुंचे आकलन होत नाही. वस्तु जशी नाही तशी दिसणे यालाच भ्रम म्हणतात. आणि आपली इंद्रिये तर पदोपदी मायेचा भ्रम निर्माण करतात. म्हणजे इंद्रिये मागे टाकून म्हणजे द्र्युष्याला मनातून काढून जर पहाता आले तरच परमात्मवस्तुंचे आकलन होईल. म्हणजेच ईथे "अलिप्त"हा शब्द समर्थानी अगदीच योग्य बसवला आहे. आता मित्रांनो तुम्ही म्हणाल की हे द्रयुष्य आणि त्यामध्ये ही इंद्रिये अशी निर्माणच का झाली ? खरं सांगायला गेले तर त्याचे समाधानकारक ऊत्तर देता येणार नाही. या विश्वाच्या अफाट पसा-यांत मानवी बुध्दीच्या पलीकडे गुढ व मतीगुंग होणारी माया नावाची परमेश्वर शक्ति आहे हे मात्र मान्य करावेच लागेल.
श्रीराम जय राम जय जय रामजय जय रघुवीर समर्थ




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## देहबुद्धीचा त्याग करावा

आधुनिक केसरी

मानाला कारण अभिमान होय. मी मोठा, असे मनाने घेतले म्हणजे मानाची गरज लागते. हा अभिमानच भगवंताच्या आणि आपल्यामध्ये आड येतो. हा अभिमान घालवायला, गुरुआज्ञेत राहणे, त्यांना शरण जाणे आणि त्यांनी सांगितलेली साधने करणे हे उपाय आहेत. पण ही साधने निरभिमानाने झाली पाहिजेत. हा अभिमान फार सूक्ष्म असतो. मी गुरुआज्ञेत राहतो, त्यांनी सांगितलेली साधने करतो, आता माझा अभिमान गेला, हे म्हणणेसुद्धा अभिमानाचेच बोलणे होय. खरे पाहता, अभिमान बाळगण्यासारखे आपल्याजवळ आहे तरी काय ? शक्ती, की पैसा, की कीर्ती ? जगात आपल्यापेक्षा कितीतरी लोक मोठे आहेत. पण मौज अशी की, भिक्षा मागणाऱ्यालासुद्धा मोठा अभिमान असतो. "मी अमक्याच्या इथे भिक्षेला गेलो होतो, त्याने मला हट् म्हटले तेव्हापासून त्याचा उंबरठा नाही चढलो मी" असे तो म्हणतो. तेव्हा हा अभिमान आणि अपमान ही काय चीज आहे याचा शोध आपण घ्यायला पाहिजे. याला अगदी मूळ कारण देहबुद्धी. ही देहबुद्धी नाहीशी झाली पाहिजे. एखाद्या झाडाला खत घालीत गेले तर ते मरेल कसे ? मला लोकांनी



बरे म्हणावे, मान द्यावा, शिव्या दिल्या तर वाईट वाटते, हे देहबुद्धीला खत घालण्यासारखे आहे. चांगले-वाईट, मान-अपमान सर्व देवाला अर्पण करावे. वस्तुतः कर्तेपणच त्याच्याकडे सोपवावे. म्हणजे त्या कृत्याचे परिणाम मनावर होऊ देऊ नयेत. व्यवहारात थोडा अभिमान लागतोच, पण तो केवळ कारणापुरता असावा. वरिष्ठाने नोकरांशी वागताना अभिमान पाहिजे, पण तो तितक्याचपुरता; त्याचा मनावर परिणाम होऊ देऊ नये. ही देहबुद्धी, हा अभिमान, जायला सद्गुरूचे होऊन रहावे. निदान बळजबरीने तरी 'मी त्याचा आहे' असे म्हणावे. सद्गुरू तुम्हांला नकळत तुमचा अभिमान दूर करतील.
परमार्थांत संतांचेच ऐकण्यात महत्त्व आहे. तेथे आईबापांचे का ऐकू नये ? तर ज्याचे मन त्याच्या ताब्यात आहे, ज्याचे मन स्थिर झाले आहे किंवा ज्याचे मन नेहमी भगवंतापाशी आहे, अशाचेच ऐकण्यात विशेष आहे. आपल्या देहबुद्धीची तऱ्हा मोठी विलक्षण असते. सगुणोपासना आपल्या सवयीच्या आड येते म्हणून मनुष्य ती करीत नाही; फारच सोपे म्हणून तो भगवंताचे नाम घेत नाही; आणि फुकट काय जेवायला घालायचे, म्हणून तो अन्नदान करीत नाही. असा मनुष्य फुकटच जायचा ! देहबुद्धीला ताळ्यावर आणण्यासाठी संतांच्या ग्रंथांच्या वाचनाची गरज आहे. पहाट झाली की थोडा उजेड, थोडा अंधार असतो, त्याप्रमाणे सध्या आपली स्थिती आहे; देहबुद्धीच्या अंधारात भगवंताच्या स्मरणाचा किंचित् उजेड आहे. हा देहबुद्धीचा अंधकार जाऊन पूर्ण प्रकाश दिसायला, भगवंताच्या अनुसंधानासारखा दुसरा कोणता उपाय असणार **? आजचे बोधवचन आहे - मीपणाची आणि अभिमानाची पूर्णाहुती देणे हाच खरा यज्ञ होय.**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

कुलीनैः सह संपर्क पण्डितैः सह मित्रताम् । ज्ञातिभिश्व समं मेलं कुर्वाणो नावसीदति ॥ सरलार्थ - कुलीन म्हणजे सभ्य व सुसंस्कृत अशा लोकांशी सहवास करावा. पंडितांशी मैत्री करावी आणि आपल्या ज्ञातिबांधवांशी सलोख्याने राहावे. (या) तीन गोष्टी करणारा (कधीही) नाश पावत नाही. स्पष्टीकरण- वरील तीन गोष्टी माणसाच्या उत्कर्षाला मदत करतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून कुठेही भरकटत जाऊ नये.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

शनिवार, ३ जून २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२६४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 3 June 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-264 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5



# शिवराज्याभिषेक

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड :** ३५०व्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने राज्य सरकारकडून रायगडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने अनेक दिग्गज नेत्यांनी रायगडावर हजेरी लावली होती. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील कुटुंबासह रायगडावर जात महाराजांना अभिवादन केले. राज ठाकरेंनी रायगडावरील फोटो शेअर करत याबद्दल एक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल केली आहे. महाराजांच्या ३०० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने तेंव्हा शिवतीर्थावर बाबासाहेब पुरंदरेंनी शिवसृष्टी आणली होती. तेंव्हा मी स्वर्गीय बाळासाहेबांसोबत जवळ जवळ रोज जायचो. त्यावेळेला संध्याकाळी रोज ७ वाजता शिवराज्याभिषेक सोहळा व्हायचा. तो मी दररोज बघायचो आणि तो मला तोंडपाठ झाला होता. तो क्षण होता की छत्रपती शिवाजी महाराज ह्या नावाने माझे आयुष्य व्यापले, भारावले, जे अजून ही तसेच आहे आणि आयुष्यभर हे मंतरलेपण राहील.मी अनेकदा रायगडावर गेलो आहे. प्रत्येकवेळी तिथे एक वेगळीच ऊर्जा जाणवते. पण आज जे मी अनुभवले, ते विलक्षण होते. मी नेहमी म्हणतो शिवचरित्र वाचल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे हा सामान्यांनी घडविलेला असामान्य इतिहास आहे. मी काल म्हणलं तसं ते एक युगप्रवर्तनच होते आणि शिवराज्याभिषेक हा त्या युगप्रवर्तनातील अतिशय महत्वाचा टप्पा होता. या हिंद भूमीच्या स्वाभिमानासाठी, स्वत्वासाठी या रयतेच्या राजाला राजसिंहासनाची, राज्याभिषेकाची नितांत गरज होती हा सुवर्णक्षण पुढची अगणित वर्ष या हिंद भूमीला प्रेरणा देत राहील इतकी ताकद ह्या घटनेत आहे. तेव्हा, छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष मनामनात घुमू दे आणि त्यांचे विचार आपल्या मराठी जनांच्या धमण्यामंधून वाहू देत, हीच इच्छा आणि हीच आजच्या दिवशी शिवचरणी प्रार्थना.

# राज्यात सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

## तुकाराम मुंडे यांची महिनाभरात पुन्हा बदली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात पुन्हा एकदा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. आज 20 आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. नाशिक महापालिका आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्याकडे आता साखर आयुक्त म्हणून नवीन जबाबदारी देण्यात आली आहे. संजीव जयस्वाल यांची म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी पदी बदली झाली आहे. मात्र, जयस्वाल यांच्याकडे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पदाचा पदभार देखील कायम राहणार. तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. तुकाराम मुंडे यांचीदेखील बदली करण्यात आली आहे. त्यांच्याकडे मराठी भाषा विभाग सोपवण्यात आला आहे.

- सुजाता सौनिक, IAS (1987) ACS (AR&OM), GAD, मंत्रालय, मुंबई यांची अतिरिक्त मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. - एमएमआरडीएचे आयुक्त असलेले एस. व्ही.आर. श्रीनिवास IAS (1991) यांच्याकडे धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. - बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक असलेले 1991 च्या बॅचचे आयएएस अधिकारी लोकेश चंद्र यांची महावितरणच्या मुख्य व्यवस्थापकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. 1995 च्या बॅचच्या आयएएस अधिकारी राधिका रस्तोगी यांची नियोजन विभागात नियुक्ती करण्यात आली. - आय.ए. कुंदन यांची अल्पसंख्याक विकास विभागात नियुक्ती करण्यात आली आहे. संजीव जयस्वाल, IAS (1996) PS, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, मंत्रालय यांची म्हाडाचे उपाध्यक्ष आणि CEO म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.- आशीष शर्मा, मुंबई यांना PS(2), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. - महावितरणचे मुख्य व्यवस्थापकीय संचलक विजय सिंघल यांची बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. - 1995 च्या बॅचच्या आयएएस अधिकारी राधिका रस्तोगी यांची नियोजन विभागात नियुक्ती करण्यात आली. - आय.ए. कुंदन यांची अल्पसंख्याक विकास विभागात नियुक्ती करण्यात आली आहे. - संजीव जयस्वाल, IAS (1996) PS, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, मंत्रालय यांची म्हाडाचे उपाध्यक्ष आणि CEO म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. - आशीष शर्मा, मुंबई यांना PS(2), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. - महावितरणचे मुख्य व्यवस्थापकीय संचलक विजय सिंघल यांची बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.




# दहावीत कोकण विभाग प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र बोर्डाकडून दहावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. बोर्डाच्या अधिकृत वेबसाइटवर हा निकाल जाहीर करण्यात आला आहे. राज्यातून एकूण १५,७७ लाख विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली असून ५३३ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. माध्यमिक बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार दहावीच्या परीक्षेसाठी एकूण १५ लाख ७७ हजार २५६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यामध्ये ८४ हजार ४१६ मुले असून ७३ हजार ६२ मुली आहेत. मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत ९३.८४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या निकालात कोकण विभागाचा निकाल ९८.११ सर्वाधिक टक्के, तर सर्वात कमी निकाल नागपूर विभागाचा ९२.०५ टक्के जाहीर झाला आहे. खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या २१,२१६ २०५७४ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून त्यापैकी १५,२७० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ७४.२५ आहे. या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण ८,३९७ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.



## ‘लखपती दीदी’

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भाजपाकडून देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. उत्तर प्रदेश भाजपा महिला मोर्चातर्फे ‘लखपती दीदी’ नावाचे अभियान राबविण्यात येणार आहे. भाजपाच्या महिला पदाधिकारी प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थींना घरोघरी जाऊन भेटणार आहेत. ३ जून पासून हे अभियान सुरू होत असून लाभार्थी महिलांना ‘लखपती दीदी’ म्हणून हाक मारली जाणार आहे. या लाभार्थी महिलांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार व्यक्त करणारे पत्रही लिहून घेतले जाणार आहे. या अभियानाच्या मागची संकल्पना अशी आहे की, आवास योजनेतून जे घर मिळाले, ते लाखो रुपयांच्या घरात आहे. त्यामुळे या महिलांना ‘लखपती दीदी’ म्हणून संबोधले जाणार आहे. १९ जूनपर्यंत चालणाऱ्या या अभियानाच्या माध्यमातून २०२४ च्या लोकसभा निवडणुकांची तयारी केली जाणार आहे. भाजपा महिला मोर्चाच्या उत्तर प्रदेशच्या अध्यक्षा आणि राज्यसभेच्या खासदार गीता शाक्य यांनी ‘द इंडियन एक्स्प्रेस’शी बोलताना सांगितले, “पीएम आवास योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या खूप मोठी आहे. घरासोबतच लाभार्थ्यांना शौचालय आणि मोफत एलपीजी कनेक्शनदेखील मिळाले आहे. या महिला लाभार्थ्यांना ‘लखपती दीदी’ संबोधले जात आहे. भाजपा कार्यकर्ते या लाभार्थ्यांची भेट घेणार असून घर मिळाल्यानंतर त्यांच्या जीवनात काय बदल झाला, याची माहिती जाणून घेणार आहेत. पक्षाचे कार्यकर्ते या संवादाचे चित्रीकरण करणार असून या क्लिप पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना पाठविल्या जाणार आहेत. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानण्यासाठी धन्यवाद मोदी जी असे पत्रदेखील लिहिण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. ज्या लाभार्थ्यांना पत्र लिहिता येत नाही, त्यांना पक्षाचे कार्यकर्ते मदत करणार आहेत. कार्यकर्ते लाभार्थ्यांच्या भावना पत्राच्या माध्यमातून शब्दबद्ध करतील आणि त्यांच्या वतीने पत्र पाठवतील. तसेच लाभार्थी आणि त्यांना मिळालेल्या घराचा फोटो काढून, तो फोटो नमो ॲपवर पोस्ट केला जाईल, अशीही माहिती गीता शाक्य यांनी दिली. ३० मेपासून ३० जूनपर्यंत भाजपाकडून राबविण्यात येणाऱ्या महासंपर्क अभियानांतर्गत महिला मोर्चाच्या कार्यकर्त्यांना सदर लक्ष्य देण्यात आले आहे. यासोबतच आणखी एक मोहीम हाती घेण्यात आली आहे, ज्याचे नाव ‘नवमतदाता युवती संमेलन’ असे देण्यात आले आहे. या मोहिमेंतर्गत पक्षातील महिला कार्यकर्त्या १८ ते २५ वयोगटातील युवतींशी संवाद साधणार आहेत. “या वयोगटातील अनेक तरुणींनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीला मतदान केल्याची शक्यता आहे. मागच्या पाच वर्षांतील मोदी सरकारच्या कामगिरीबाबत त्यांना काय वाटते आणि भविष्यात त्यांच्या सरकारकडून काय अपेक्षा आहेत, हे आम्ही तरुणींना विचारणार आहोत. तसेच या मुलींची राजकीय विचारधारा आहे का? असेल तर त्या विचारधारेशी जोडून घेण्याचे कारण काय? असेही प्रश्न या वेळी विचारले जातील. त्यासोबतच २०२४ साली पहिल्यांदा मतदान करणाऱ्यांनाही असेच प्रश्न विचारले जातील. मोदी सरकारने मागच्या नऊ वर्षांत महिलांच्या सबलीकरणासाठी काय काय केले. त्यांची सुरक्षा आणि शिक्षणासाठी काय केले, याची माहिती या तरुणींना करून दिली जाईल, अशी माहिती पक्षातील अन्य पदाधिकाऱ्यांनी दिली.

## गोपीनाथरावजी मुंडे साहेब



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सामाजिक राजकीय जीवनात नेतृत्व निर्माण होत असत काळाबरोबर ते संपुष्टात पण येत असत.लोकांसोबत जोडलेली नाळ अंखडीत मरणोत्तर अमरत्व निर्माण करणारी ठरण हे खुप कमी लोकांच्या नशीबी असत. खडतर संघर्ष आणि दैदिप्यमान इच्छा शक्तितुन दिग्गज घडतो याची प्रचिती महाराष्ट्रासह संबंध देशाला घडविणारे देशासह राज्याच्या राजकारणात एक ठसा उमठवत राखेतून उभा रहणारया फिनिक्स पक्षा सारखं स्वतःच अस्तित्व शुन्यातून निर्माण करत. आमदार, प्रदेश अध्यक्ष, उपमुख्यमंत्री, खासदार केंद्रीय ग्रामविकासमंत्री अशा अनेक पदांना गवसणी घातली.**

यशस्वी प्रवास करताना यशाच्या शिखरावर असताना एक दुर्दैवी क्षण मराठवाड्यासह महाराष्ट्र राज्याच्या तोंडाला पानं पुसतो अशी वेळ आली आणि तीन जुनं हा दिवस उजडो नये अशी इच्छा महाराष्ट्र राज्यातील लाखो लोकांना आजही वाटते त्याच काळ रात्रीने लाखो वंचितांचा देव सगळ्यांना सोडुन गेला.

गोपीनाथरावजी मुंडे या नावाची ‘जादू’ राज्याचा राजकीय पटलावर सातत्याने आजही कायम असुन लोकांच्या मनात देवत्व निर्माण झालं असुन लोकांच्या हृदयातुन देव्हाऱ्यात जाग निर्माण करत जस जस वेळ लोटती आहे तसं तसं नाव संपुष्टात येत असत पण मुंडेसाहेबांच्या बाबतीत जशी वेळ जातेय तशी लोकप्रियता वाढत चालली आहे आणि आजतर वंचितांचा देव आधार वड म्हणून राज्यातील लाखो लोकांच्या मनात स्वर्गिय मुंडे साहेब यांच्या बदल एक वेगळं स्थान निर्माण झाला आहे हि मुंडे यांनी आयुष्यभर केलेल्या उत्तम कार्याची पावती आहे. राज्यातील लाखो लोक आपलं दैवत म्हणून मुंडे साहेब यांच्या कडे आजही पाहतात .मुंडे या नावाची ताकद आणि जादु राज्यात आजही त्याच ताकदीने कायम आहे. फक्त राजकारणच नाही तर इतर वेगवेगळ्या क्षेत्राला देखिल मुंडे साहेब यांच्या नेतृत्वाची भुरळ पडत होती.मग सामाजिक,असो कि सांस्कृतिक विश्वालाही कायम आपल्या आकर्षणाच्या वलयात गुंतवून ठेवणारे साहेब लाखो मनाला भुरळ घालत असत राज्यात कोणत्याही मार्गावर प्रवास कुठेही थांबले तर क्षणात वीस पंचवीस हजाराच्या वर लोकांची गर्दी अगदी दहा मिनिटात होत असे एवढी अफाट आणि अचाट लोकप्रियता आपल्या कार्याने मुंडे साहेब यांनी कमावली होती .साहेब आले... साहेबांनी भाषण केले... अन व्यासपीठ जिंकले नाही अस कधीच झालं नाही पाच पाच सहा तास लोक त्यांचं भाषण ऐकण्यासाठी बसुन वाट पाहायचे.याचा अनुभव त्यांच्या चाहत्यांना नेहमीच यायचा.... 3 जून 2014 रोजी मात्र हा सारा नूरच पालटला आणि त्यामुळे देशाचे, महाराष्ट्राचे आणि प्रामुख्याने जास्तीत जास्त नुकसान बीड जिल्ह्याचे झाले.

महाराष्ट्रासह, देशात अनेक नामवंत, दिग्गज घडविणारे, आपल्या वक्तृत्व शैलीतून व्यासपीठ गाजविणारे तसेच सर्व क्षेत्रात कायम आघाडी घेणारे, यशाचे शिखर गाठणारे, अगदी कितीही छोट्या प्रश्नापासून ते मोठ्या प्रश्नांचे उत्तर जेथे मिळत होते असे नेत्रदीपक नेतृत्व आणि कोणताही प्रश्न सोडवण्याची धमक-दैवी शक्ती प्राप्त असणारे अष्टपैलू नेतृत्व म्हणजे विविध क्षेत्रातील दिग्गज घडविणारे विद्यापीठ म्हणजे स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब.

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र , लोकनेते , ऊसतोड कामगार नेते ते साखर सम्राट महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, सहकार कृषी, उद्योग क्षेत्रात स्वकर्तृत्वावर नाव लौकिक मिळवलेले आणि लोकनेता ही उपाधी प्राप्त झालेले एक दैदिप्यमान नेतृत्व म्हणजे नाथ्रा परळी 12 डिसेंबर 1949 रोजी शेतकरी कुटूंबात जन्म झालेले लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे प्राथमिक शिक्षण बिकट परिस्थिती मध्ये पुर्ण झाले .बाल वयात वडीलांचे छात्र हारवले . कठीण परिस्थितीत असताना शिक्षण पुर्ण करत करत विद्यार्थी दशेतच साहेबांनी विविध आंदोलने करून सामाजिक परिवर्तन व विकासाची चळवळ गतिमान करण्यासाठी . प्रवाहाच्या विरुद्ध प्रवास ,संघर्ष करून शुन्यातील राजकिय पक्ष सत्तेच्या पटावर पोहचवला. राजकीय, सामाजिक जीवनात कार्य करत असताना साहेबांकडे अनेक महत्वाची पदे चालत आली. त्यांच्या मुळे त्या पदांना अर्थ मिळाला प्रतिष्ठा मिळाली नावलौकिक झाला . महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष विधानसभा विरोधी पक्षनेते पद राज्याचे उपमुख्यमंत्री गृहमंत्री, उर्जामंत्री वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन , वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिट्यूट पुणेचे संचालक बीड लोकसभा खासदार लोकलेखा समिती चे अध्यक्ष भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष केंद्रीय ग्रामविकास मंत्री अशी अनेक महत्वाची पदे त्यांनी यशस्वीपणे भूषविली .आपल्या पदाचा व सत्तेचा वापर वंचित,पीडित , बहुजन समाजाच्या दारात सत्तेची गंगा आणण्यासाठी केला तसेच . सामाजिक न्यायची भुमिका घेत लाखो गोरगरीब , सामान्य घटकातील वंचित, बहुजन समाजातील होतकरू, हुशार ,मुलांना साहेबांनी त्यांच्या गुणवत्ते नुसार नोकऱ्या दिल्या. साहेबांच्या संपर्कात आलेल्या अनेक लोकांच्या जीवनाच सोनं केलं . मराठवाडा हा कायम दुष्काळग्रस्त प्रदेश असल्याने नेहमीच अन्या अत्याचार , गुलामगिरी वाटयला आलेली आणि प्रत्यक्ष अनुभवलेली भोगलेली . मराठवाड्याच्या हिताचा विचार करणारे मोजके नेते होते.विकासाचा अनुशेष इतर विभागाच्या तुलनेत मोठा बाकी होता. विकास कामाच्या बाबत मराठवाड्यावर कायम अन्याय व्हायचा ही बाब मुंडे साहेब यांना नेहमी अस्वस्थ करायची-खटकायची मराठवाड्यातील जनतेत स्वाभिमान निर्माण केला .त्यांना आत्मसन्माने जीवन जगण्याचा मंत्र दिला. महाराष्ट्रातील अनेक आंदोलनाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. अनेक युवकांना प्रवाहात आणले त्यांना दिशा दिली .त्यामुळेच साहेबांना मानणारा मोठा वर्ग समाजात निर्माण झाला . ज्यांना कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती अशा तरूणांचा शोध घेऊन त्यांना सत्तेच्या माध्यमातून प्रवाहात आणले . अनेकांना सत्तापदे देऊन प्रतिष्ठा प्राप्त करून दिली .नेत्यांची पिढी घडविणारे साहेब हे राजकीय, सामाजिक विद्यापीठच होते. राष्ट्रसंत भगवान बाबा यांनी निर्माण केलेला भगवानगड म्हणजे राजकीय शक्तीच अशी ओळख जगभरात करुन दिली. साहेबांची भगवान बाबा यांच्या वरील श्रद्धा एवढी अफाट होती कि बाबांच्या आशिर्वादानेच प्रत्येक निवडणूक ते सहज जिंकत असत आणि भगवान गडावरून मला दिल्ली दिसतेय असं नेहमी म्हणत असतं तसेच भगवानगडाचा दसरा मेळावा हा उत्सव स्वरूपात ऐतिहासिक क्षण ठरायचा अनेक दिग्गज उपस्थित असायचे दसरा मेळाव्याला किमान 5 लाखापेक्षा जास्त गर्दी असायची. साहेब काय बोलणार ? साहेबांचे पुढचे राजकीय डावपेच काय ? याकडे सर्व देशाचे लक्ष असायचे. भगवानगडाला साहेबांनी विशेष ओळख प्राप्त करुन दिली होती.



आपल्या स्वाभिमानी निडर, बेधडक व स्पष्टवक्ते पणामुळे महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात साहेबांनी वेगळे स्थान निर्माण केले. महाराष्ट्रात शिवनेरी ते शिवतीर्थ संघर्ष यात्रा काढुन सत्ता परिवर्तन घडवून आणल . राज्याच्या कानाकोपऱ्यात अनेक, प्रचार सभा , त्यांनी गाजवल्या. जिल्हा परिषद ते विधानसभा आणि विधानसभा ते लोकसभा हा त्यांचा प्रवास थक्क करणारा होता.जन माणसात प्रचंड आदर व प्रशासनात दरारा होता. दिलेला शब्द पाळणारा हा निष्ठावंत नेता होता. सिंहासनाला थरकाप घडवणारा, हा लढवय्या संघर्ष योध्या होता. लढणे व संघर्ष करणारे ते नितिवंत रणधुरंधर नेते होते. साहेब म्हणजे एक अंगार होते. मात्र आपल्या ताकदीचा उपयोग त्यांनी सर्व सामान्य माणसांच्या विकासासाठी केला. सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन त्यांनी बहुजन समाजाच पक्ष अशी भाजपाची प्रतिमा निर्माण केली. जनसामान्य माणसांच्या मनावर राज्य करणारे ते नेते होते . महाराष्ट्रातील गावागावात साहेबांना माणनारा मोठा वर्ग आहे . जिवंतपणीच आख्यायिका आणि अनेकांच्या देवघरातील देव व्हावा हे भाग्य साहेबांना लाभले होते. आजही त्यांच्या कार्याची माहिती अनेकजण भेटल्यावर देतात. साहेबांनी केलेल्या कामाची व मदतीची आठवण करून देतात. लोकनेता हे जनमाणसानींच त्यांना बहाल केलेली उपाधी होती . साहेब हे मराठवाड्याचे, महाराष्ट्राचे भूषण होते , विविध क्षेत्रातील दिग्गज घडविणारे विद्यापीठ म्हणून साहेबांची इतिहासाला नोंद घ्यावी लागेल एवढी प्रचंड महती साहेबांची होती . मराठवाड्याच्या मातीला आणि माणसांना अभिमान वाटावा , मस्तक उंचवावं आणि पाठीचा कणा ताठ व्हावा अशा आभाळ उंचीचे नेतृत्व म्हणजे गोपीनाथरावजी मुंडे साहेब नावाचं शक्तीपीठ सकारात्मक उर्जा केंद्र म्हणजे साहेब

मा . प्रमोद महाजन , मा .विलासराव देशमुख , यांच्या अकाली जाण्याने मराठवाडयाचे फार नुकसान झाले . नेतृत्वाविना मराठवाडा पोरका झाला आहे . अशा अस्थिर काळात साहेब तुमची मराठवाड्याला व महाराष्ट्राला प्रचंड गरज होती . आणि नेमकं याच वेळी नियतिने आपला डाव साधला . आणि महाराष्ट्र पोरका झाला . साहेब तुमचा स्वाभिमानी बाणा , विकासाची तळमळ , प्रचंड संघर्ष आणि लढाऊ बाणा आम्ही कधीही विसरणार नाही. तुमचे विचार व कार्य पुढे घेऊन जाणे हीच तुम्हास श्रद्धांजली ठरेल. साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम.

## एकमेव लोकनेते गोपीनाथ मुंडे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९१२२५४६२१५

आधुनिक केसरी

**कोणताही राजकीय वारसा नसताना, स्वकर्तृत्वाने राजकारणाचे शिखर गाठणारे नेते भारतीय राजकारणात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असतील यात लोकनेते म्हटले जाणारे एकमेव नेते म्हणजे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब. आज ३ जून, आज साहेबांची पुण्यतिथी आजच्याच दिवशी म्हणजे ३ जून २०१४ रोजी साहेब आपल्या लाखो अनुयायांना पोरके करून निघून गेले. १२ डिसेंबर १९४९ रोजी बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जमलेल्या गोपीनाथ मुंडे यांच्या वडिलांचे नाव पांडुरंगराव आणि आईचे नाव लिंबाबाई मुंडे असे होते. १९६९ सालीच गोपीनाथ मुंडे यांचे पितृछत्र हरपले. वडीलबंधु पंडितअण्णा यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते आंबेजोगाई येथे आले तिथेच त्यांच्यातील नेतृत्व समाजासमोर आले.**

महाविद्यालयीन निवडणुकीद्वारे त्यांचे नेतृत्व उदयास आले. याच सुमारास त्यांची ओळख भाजप नेते प्रमोद महाजनांशी झाली आणि त्यांच्यात मैत्री निर्माण झाली ही मैत्री पूढे पन्नास वर्षे टिकली. महाजनांनी मुंडे यांच्यातील नेतृत्वगुण हेरून त्यांना अखील भारतीय विद्यार्थी परिषदेशी जोडले. पुढे या जोडीने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक आंदोलनात एकत्र भाग घेतला. दोघेही जनसंघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. आणीबाणीला विरोध केल्याने गोपीनाथ मुंडे यांना कारावास भोगावा लागला. १९७८ साली मुंडे साहेब जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे १९८० साली ते रेणापूर मतदारसंघातून पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. या दरम्यान त्यांनी भाजपला घराघरात पोहचवण्याचे काम केले. भाजप हा ब्राह्मणांचा पक्ष आहे. ही ओळख खोडून काढण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात 'माधव' चा प्रयोग केला आणि भाजपला बहुजनांचा पक्ष बनवला. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रयत्नांमुळेच बहुजनवर्ग भाजपकडे वळला. गोपीनाथ मुंडे हे उत्कृष्ट वक्ते होते. आपल्या धारधार वक्तृत्वाने त्यांनी सभा गाजवायला सुरवात केली. विधिमंडळात असो की विधिमंडळाबाहेर सार्वजनिक सभेत असो मुंडे साहेब आपल्या वक्तृत्वाने श्रोत्यांची मने जिंकत असत. विरोधी पक्षात असूनही महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय नेत्यांत त्यांची गणना होऊ लागली. विरोधी पक्षनेते या नात्याने ते सत्ताधाऱ्यांवर तुटून पडायचे. १९९१ ते १९९५ या काळात ते विरोधी पक्षनेते असताना सत्ताधारी काँग्रेसपक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले होते. १९९५ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरे करून जनमत तयार केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच १९९५ साली राज्यात युतीचे सरकार आले. या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री बनले शिवाय गृहमंत्रीपदाची जबाबदारी देखील त्यांचावरच होती. गृहमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. गृहमंत्री असताना त्यांनी गुन्हेगारांविरुद्ध धडाकेबाज कारवाई केली. पोलिसांना अधिकार दिले. एन्काऊंटर हा शब्द तेंव्हाच रूढ झाला. मुंबईतून गँगवार हद्दपार करण्यासाठी त्यांनी पोलिसांना मोकळीक दिली त्यांच्यामुळेच मुंबईतील गुन्हेगारी टोळ्या नष्ट झाल्या तर काहींनी देशाबाहेर पलायन केले. गोपीनाथ मुंडे हे कुशल प्रशासक तसेच समन्वयक देखील होते भाजप सेना युतीत तणाव निर्माण झाला की ते निवळण्याचे काम गोपीनाथ मुंडेच करायचे. त्यांचे आणि बाळासाहेबांचे खूप जवळचे संबंध होते. पुढे युतीची महायुती करण्याचे कामही त्यांनी केले त्यांच्यामुळेच राजू शेट्टी, रामदास आठवले, महादेव जानकर यासारखे नेते भाजपशी जुळले. २०१४ साली महाराष्ट्रात आणि केंद्रात सत्ता आणण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली. नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले. गोपीनाथ मुंडे हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व होते. ते भाजपचे असूनही विरोधी पक्षातील नेत्यांशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. विलासराव देशमुख आणि छगन भुजबळ यांच्याशी त्यांचे असलेले मैत्रीचे संबंध सर्वश्रुत आहे. २०१४ साली ते जेंव्हा केंद्रात कॅबिनेट मंत्री बनले तेंव्हा संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला मात्र हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. ३ जून २०१४ रोजी एका अपघातात त्यांचे निधन झाले आणि संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन !



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मानवतावादी काव्यक्षितिज अधिक विस्तीर्ण व्हावे

## संगीता झिंजुरके यांचे प्रतिपादन; बंधुतादिनी पाचव्या बंधुता काव्य महोत्सवाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** काव्य, गीत आणि संगीत यांना भाषा, प्रदेश किंवा विदेशाच्या सीमा रोखू शकत नाहीत. मानवतावादी भावविश्व गुंफणारे हे साहित्य सहजपणे सर्वदूर पोहोचते. कवी, गीतकार व संगीतकार यांनी आपल्या उत्कट प्रतिभेला ज्ञान, विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन हे काव्य क्षितिज अधिकाधीक विस्तीर्ण करावे," अशी अपेक्षा ज्येष्ठ कवयित्री संगीता झिंजुरके यांनी व्यक्त केली. पाचव्या बंधुता काव्य महोत्सवाच्या अध्यक्ष स्थानावरून झिंजुरके बोलत होत्या. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या काव्य महोत्सवाचे उद्घाटन साहित्यिक प्रा. चंद्रकांत वानखेडे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी बंधुताचार्य प्रकाश रोकडे, मंदाकिनी रोकडे, स्वागताध्यक्ष हरिश्चंद्र गडसिंग, शिवव्याख्याते प्रदिप कदम, डॉ. अशोककुमार पगारिया, प्रा. डॉ. प्रभंजन चव्हाण उपस्थित होते. यावेळी पत्रकारिता आणि जनसंपर्क क्षेत्रातील योगदानाबद्दल जीवराज चोले यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता पुरस्कार', तर काव्य निर्मितीसाठी ज्ञानेश सुर्यवंशी, नंदा कोकाटे, वीणा व्होरा, नंदकिशोर लांडगे, नितीन गायके, राजश्री मराठे, प्रिती वानखेडे, गजानन गायकवाड, महादेव सुरवसे, कल्पना देशमुख यांना 'बंधुता काव्यप्रतिभा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, बंधुता प्रतिष्ठान, काषाय प्रकाशन, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, भोसरी येथील भगवान महावीर शिक्षण संस्थेचे प्रीतम प्रकाश महाविद्यालय, भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गेली पाच दशके बंधुतेचा विचार जनमानसात रुजविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांचा जन्मदिवस बंधुता दिन म्हणून साजरा करण्यात आला.




संगीता झिंजुरके म्हणाल्या, "कविता, संगीत आणि साहित्यावर प्रेम करणारी माणसे मानवतावादी असतात. साहित्यिकांमध्ये बंधुतेचा विचार घडवण्याची ताकद असते. जगाच्या नकाशावर बंधुतेचे स्थान अढळ करण्यासाठी बंधुतेची जाण असणारे साहित्यिक निर्माण व्हावेत. बंधुतेचा विचारातून मानवतेचे दर्शन कायम घडत आहे. प्रकाश रोकडे म्हणाले, "समाजामध्ये वावरत असताना माणूस होणे गरजेचे आहे. कोणत्याही जातीचे लेबल न लावता बहुभाषीय, बहुधर्मीय होत आम्ही सारे भारतीय आहोत, हा विचार आपल्या मनात रुजला पाहिजे. 'गर्व से कहो हम बंधू है' हे ब्रीदवाक्य घेऊन काम सुरु आहे. समाजातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्यायाची भूमिका जपण्याचे कार्य व्हावे. प्रा. चंद्रकांत वानखेडे म्हणाले, "समाजाला एकसंध ठेवण्यासाठी बंधुतेचा धागा महत्वाचा आहे. जाती-धर्मातील, प्रांतातील भेदाभेद बाजूला ठेवून मानवतेच्या आणि बंधुतेच्या विचारांनी एकत्र आलो, तर जगात शांतता नांदेल. बंधुतेच्या मार्गावरील आपण सर्व पांथस्थानी हा विचार पुढे घेऊन जायला हवा. दुपारच्या सत्रात बंधुता प्रबोधन यात्री काव्यसंमेलन झाले. नितीन वायाळ (गुजरात), मधुश्री ओव्हाळ, गुलाब राजा फुलमाळी, प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांच्यासह महाराष्ट्रातील नामवंत कवी सहभागी झाले. यावेळी प्रा. संतोष काळे (पलूस) यांना बंधुता प्रकाशपर्व साहित्य पुरस्कार, डॉ. सुशील सातपुते यांना बंधुता प्रकाशयात्री साहित्य पुरस्कार आणि गोपाळ कांबळे (पुणे) यांना बंधुता प्रकाशगाथा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. अशोककुमार पगारिया, प्रदीप कदम यांनी मनोगते व्यक्त केली. हरिश्चंद्र गडसिंग यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. शंकर आथरे यांनी सूत्रसंचालन केले. बंडोपंत कांबळे यांनी आभार मानले.

# जर्मनीतील तिकीट प्रदर्शनात लार्ज गोल्ड मेडल पुरस्काराने किशोर चांडक सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भारतामध्ये पहिलं टपाल



तिकीट हे १९५२ साली निघाले. असं असलं तरी त्यापूर्वीही भारतात पत्रव्यवहार सुरु होताच मग अशा वेळी ज्या गावांमधून टपाल निघाले त्यागावाचा शिक्का मारला जातं असे तर ज्या गावात ते टपाल पोहंचते केले जातं असे त्या गावाचा शिक्कामोर्तब करुन ते टपाल त्या व्यक्तीला सुपुर्त केले जातं असे. अस्तित्वात असणारा व माहित असलेला पहिला शिक्का हा भारतीय डाक खात्यांनी १७७४ साली मारलेला होता.१८५२ साली पहिलें भारतीय टपाल तिकीट निघे पर्यंत अशा प्रकारचे शिक्के मारुनच भारतीय टपाल खात्याची देवाण घेवाण सुरु होती. सोलापूर येथील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे टपाल तिकीट संग्रहाक किशोर चांडक यांनी अशा शिक्यांचा सखोल अभ्यास करून आपला एक टपाल तिकीटांचा संग्रह जर्मनीतील आंतरराष्ट्रीय स्तरावरील टपाल तिकीटांच्या स्पर्धेत ठेवलेला होता. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील टपाल तिकीटांच्या स्पर्धेत जगामधील २,८०० लोकांनी सहभाग घेतला होता. २९ मे २०२३ रोजी सोलापूरच्या किशोर चांडक यांच्या टपाल तिकीटांच्या संग्रहास लार्ज गोल्ड या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. किशोर चांडक यांनी १९६३ सारखं पासुन टपाल तिकीटांच्या संग्रहास सुरुवात केली आहे. असं असलं तरी १९८३ सारखं पासुन किशोर चांडक यांनी टपाल तिकीटांच्या प्रदर्शनांच्या स्पर्धांमधून भाग घेण्यास सुरुवात केली आहे. किशोर चांडक यांना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अनेक मानसन्मान पुरस्कार यापूर्वीही मिळालेले आहेत.व्हर्मिल , लार्ज व्हर्मइल , तसेच सुवर्ण पदकांनीही सन्मानित करण्यात आलेले आहे. किशोर चांडक यांच्या कार्यामध्ये त्याची पत्नी श्रृती त्याची मुलं वृणाल आणि वेदांत यांचे मोलाचे सहकार्य प्रोत्साहन मिळत असते असे त्यांनी बोलताना सांगितले. जर्मनीमधील या आंतरराष्ट्रीय टपाल तिकीट संग्रहामध्ये ठेवलेल्या पाकिटावर मारलेले अनेक शिक्के हे अद्वितीय व एकमेव असे होते. या प्रदर्शनात ठेवलेल्या एका पाकिटावर मारलेला शिका १८३६ सालातील सोलापुरांमधून वापरलेल्या पाकिटावर वरील तो शिक्का होता. हे पाकीट आणि तो शिका देखील एकमेव अद्वितीय असा होता. या सर्वांचा विचार करून या आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळांनी त्याचा सखोल अभ्यास करून किशोर चांडक यांच्या संग्रहाला लार्ज गोल्ड मेडल हा जगातला टपाल तिकीट संग्रहात मधील सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचे निश्चित केले. सोलापूर सारख्या ठिकाणी राहून किशोर चांडक यांनी जमवलेल्या अशा टपालावरील .. पाकिटांवरील मारलेल्या शिक्क्यांचा संग्रह जगात सर्वोत्कृष्ट ठरला. अशा प्रकारचा लार्ज गोल्ड मेडल हा जगातील बहुमूल्य अनमोल असा पुरस्कार किशोर चांडक यांना मिळाला.

# पोलीस पथकावर जमावाचा हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** खामगाव तालुक्यातील बोरी अडगाव येथे मंगळवारी सशस्त्र दरोड्याप्रकरणी 'कॉंबिंग ऑपरेशन' राबवणाऱ्या पोलीस पथकावर जमावाने हल्ला केल्याची खळबळजनक घटना फत्तेपूर (ता. खामगाव) येथे आज शुक्रवारी उत्तररात्री घडली. यामुळे जिल्हा पोलीस दलात खळबळ उडाली असून किमान २५ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. पोलीस पथक फत्तेपूर घाटातील पारधी वस्तीवर रात्री 'कोंबिंग ऑपरेशन' राबवत असताना, तेथील नागरिकांनी पोलिसांना मनाई करून लोटपाट व मारहाण केली. याप्रकरणी शासकीय कामात अडथळा आणि मारहाण करणाऱ्या जवळपास २५ जणांवर हिवरखेड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे कर्मचारी जखमी युवराज राठोड यांनी हिवरखेड पोलिसात तक्रार दिली.



अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,
संपर्क : मो. 7588818406

# भंडारा जिल्ह्याचा दहावीचा निकाल ९३.६६ टक्के

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे शुक्रवारी इयत्ता दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला. यात भंडारा जिल्ह्याने नागपूर विभागातून दुसऱ्या स्थानावर बाजी मारली आहे. जिल्ह्याचा निकाल ९३.६६ टक्के इतका लागला. यावेळीही मुलांपेक्षा मुलींनी बाजी मारली असून निकालाच्या टक्केवारीत जवळपास पाच टक्के अधिक मुली परीक्षेत पास झाल्या आहेत. जिल्ह्यातील २८४ शाळांमधून एकूण १६ हजार १७१ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यात १६ हजार ८२ विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केली. या शाळांपैकी ७१ शाळांचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna 8623904312
Abhijeet Shukla 9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

EPFO EPS-1995 Option Form
Before 01.09.2014
After 01.09.2014
ऑनलाईन फॉर्म आमच्याकडे भरुन मिळेल
कागदपत्र-पी.पी.ओ.नंबर, यु.ए.एन.नंबर, आधार कार्ड (मोबाईल लिंक असणे गरजे), ई-मेल आय., बँक पासबुक.
AADHAAR आधार सेवा केंद्र
• जन्म तारिख • नावात बदल
• मोबाईल नंबर • पत्यात बदल
• मेल आय.डी. • लग्नानंतरचे नाव
आधार काढून १०वर्ष झाली असेल तर अपडेट करुन मिळेल.
अधिक माहितीसाठी संपर्क संचालक-दत्ता जाधव
महा ई-सेवा केंद्र
कॉमन सर्व्हिस सेंटर
आपले सरकार सेवा केंद्र
बँक ऑफ महाराष्ट्र समोर, एन-७, सिडको.
मो. ९ ४ ० ३ ३ ४ ५ ७ ३ ९

CAFÉ ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come true..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# ओबीसीचे आरक्षण हडप करण्याचा सरंजामी डाव

आधुनिक केसरी

**29 मे 2023 रोजी महाराष्ट्र शासनाने एक समिती गठीत केल्याचा शासन निर्णय जारी केला आहे. मराठवाड्यातील मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत सुसूत्रता आणण्याच्या उद्देशाने ही समिती स्थापन केल्याचे दिसून येत आहे. या शासन निर्णयाच्या प्रस्तावनेत सांगितल्याप्रमाणे मराठवाडा विभागात मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत आहेत. यावरून असे दिसून येते की सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा घाट शासनाने घातलेला आहे. विदर्भ आणि इतर महाराष्ट्राच्या काही भागातील कुणबी हा शैक्षणिक व सामाजिक मागास आहे. काका कालेलकर आयोग व मंडल आयोग यांनी लावलेल्या कसोट्यामध्ये हा समाज पात्र ठरला होता. त्यामुळे केंद्रीय ओबीसी सूचीमध्ये कुणबी समाजाला समाविष्ट करण्यात आले होते.**

नुकताच 5 मे 2021 रोजी सुप्रीम कोर्टाने मराठा समाजाला दिलेले आरक्षण रद्द केले आहे. कुणबी समाज वगळून मराठा समाजाच्या शैक्षणिक सामाजिक मागासलेपणाची तपासणी करण्यासाठी शासनाने न्यायमूर्ती गायकवाड आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाने घटनेच्या कलम 15 ( 4 )आणि 16 ( 4 ) अंतर्गत मराठा समाज सामाजिक आणि शैक्षणिक मागास असून त्याला पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही असा अहवाल शासनाला दिला होता. तसेच मराठा समाजाच्या बाबतीत अपवादात्मक परिस्थिती असल्याचा निर्वाळाही या गायकवाड आयोगाने दिला होता. सदरील आयोगाच्या सर्व बाबी रद्दबातल करत सुप्रीम कोर्टाने मराठा समाजाचे सामाजिक शैक्षणिक मागासले पण नाकारले होते. तसेच याबाबतीत कुठलीही अपवादात्मक परिस्थिती नसल्याचे ही कडक शब्दात न्यायालयाने स्पष्ट केले होते. कुणबी सोडून याच मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याचा घाट म्हणजे न्यायालयाच्या निकालाचा भंग करणे होय. जो समाज शैक्षणिक व सामाजिक मागास नाही हे सिद्ध झाले असतानाही त्याला अगोदरच्या समाजाशी जोडत ओबीसीमध्ये समाविष्ट करणे म्हणजे घटनाद्रोह आहे.
ओबीसीच्या यादीमध्ये कुठल्याही समाजाचा समावेश करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग कार्यरत असतो.15 मार्च 1993 पासून महाराष्ट्र राज्यात न्यायमूर्ती खत्री यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोग गठीत झाला. या आयोगासमोर सहा वेळा मराठा आरक्षणाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला या सर्व प्रकरणात मराठ्यांचा ओबीसी मध्ये समावेश करण्यास एकमताने नकार देण्यात आला. ओबीसीसाठी 1953 सर्वप्रथम स्थापन झालेल्या काका कालेलकर आयोगापासून मराठ्यांच्या ओबीसीकरणाला विरोध सुरू झाला. कालेलकर आयोगाने राज्यवार मागास जातीच्या याद्या तयार केल्या होत्या त्यात मुंबई राज्याच्या मागासांच्या यादीत क्रमांक 206 वर कुणबी जात समाविष्ट आहे परंतु 360 मागास जातीच्या या यादीत मराठा समाज कुठेही नाही. मंडल आयोगाने मराठा समाजाला ओबीसी आरक्षण नाकारले. एवढेच नाही तर त्यानंतर मुटाटकर समिती, आरमारी मराठा अहवाल, मराठा अक्करमाशी अहवाल, साळू मराठा अहवाल, बापट आयोग, केंद्रीय मागासवर्ग आयोग, सर्व मराठा समाज अहवाल, वायदेशी मराठा अहवाल इत्यादी अनेक समिती व आयोगांनी स्पष्टपणे नकार दिलेला असताना पुन्हा पुन्हा मराठा आरक्षणाचा विषय शासकीय पटलावर आणून ओबीसी समाजाला भयभीत केले जात आहे. 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 27टक्के आरक्षण मिळाले यामुळे अनेक ओबीसी राजकीय पटलावर चमकू लागले .ही गोष्ट सरंजामी प्रवृत्तीच्या लोकांच्या डोळ्यात खूपु लागली आहे.आपली राजसत्तेवरील पकड सुटू नये म्हणून ओबीसी राजकीय जागृतीला सुरू लावण्यासाठी त्यांना मराठा समाजाची ओबीसी मध्ये घुसखोरी आवश्यक वाटते. वेगवेगळ्या आयोगांनी दहा वेळा नकार दिल्यानंतर मराठा -कुणबी कुणबी-मराठा अशी शाब्दिक चलाकी करून ओबीसी मध्ये घुसण्याचा कायम खटाटोप चालू असतो. राजकीय सत्ता हा 96 कुळी मराठ्यांचा ऑक्सिजन आहे त्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. आजतागायत मराठवाड्यातील राजकीय घराण्यांनी ओबीसी आरक्षणातून जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका यामध्ये अनेक बोगस सर्टिफिकेट काढून ओबीसी आरक्षण लाटले आहे. ओबीसी आरक्षणात उमेदवार उभा करता यावा म्हणून आपल्या घरातील विवाह विदर्भातील कुणबी मुलीशी केले आहे. मराठवाड्यातील अनेक शिक्षण संस्थांमध्ये ओबीसी आरक्षित जागेसाठी खास विदर्भातून कुणबी मराठा किंवा मराठा कुणबी उमेदवार बोलवून नोकऱ्या देण्यात येतात. मराठा समाजाची ओबीसीकरण करणे म्हणजे मूळ ओबीसीला बेघर आणि बेवारस करणे. कुणबी हे फक्त विदर्भ आणि कोकणात असताना त्याचा शोध मराठवाड्यात का घेतला जात आहे . मराठवाड्यातील मराठा समाजाला न्यायमूर्ती गायकवाड आयोगाने दिलेले आरक्षण सुप्रीम कोर्टाने फेटाळलेलआहे . म्हणजे हा समाज शैक्षणिक व सामाजिक मागास नसताना पुन्हा यासाठी शासनाने 29 मे 2023 रोजी समिती गठीत केली आहे. हा सरळ सरळ घटनद्रोहच नाही तर सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा अवमान आहे. मराठवाड्यातील मराठ्यांना ओबीसी सर्टिफिकेट देण्यात आले तर तमाम ओबीसी समाज या विरोधात रस्त्यावर उतरून जन आंदोलन करेल . न्यायालयात अवमान याचिका दाखल केली जाईल.ओबीसी रोषाला शासनाला सामोरे जावे लागेल.




**प्रा.डॉ. वसंत हरकळ**

# लालपरीचा वाढदिवस



सीमा गाडेकर
9423172305

आधुनिक केसरी

**आज लाल परीच्या वाढदिवसानिमित्त माझ्या मनातील लाल परी बद्दलच्या भावना मी इथे मांडत आहेत... कृपया वेळात वेळ काढून आपण त्या वाचाव्यात आणि माझ्या भावना कशा वाटल्या अवश्य प्रतिक्रिया देऊन कळवावे ही विनंती... आज १ जून, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला ७५ वर्षे पूर्ण झाली, म्हणजेच आपल्या सर्वांच्या लाडक्या लाल परीचा आज ७५ वा वाढदिवस!**



भारतातील जवळपास 70 टक्के लोकसंख्या ही खेड्यापाड्यात आणि वाड्या वस्त्यांवर राहते. अशा या सर्व खेड्यांना व वाड्या वस्त्यांमध्ये दळणवळण करण्यासाठी धावून येणार हक्काचं साधन म्हणजेच लाल परी होय . डोंगरदऱ्यातून, गर्द झाडीतून डौलाने धावणारी लाल परी पाहिले की मला आजही बालपणी इतकाच आनंद होतो... लाल परी चा लाल रंगामुळे दुरूनच ती येताना दिसते. बोटावर मोजण्याइतपत लोकसंख्या असणाऱ्या खेडेगावात सुद्धा लाल परी दिलेल्या वेळेत आपलं काम पूर्ण करताना दिसते मग त्या गाडीत प्रवासी असो किंवा नसो. कधी कधी तर गाडीत फक्त ड्रायव्हर आणि कंडक्टर या व्यतिरिक्त कुणीच नसते तरीपण लाल परी खाचखळगे असणाऱ्या कच्च्या रस्त्याने न थकतां न वैतागता आपले काम इमानेइतबारे करताना दिसते. आज मी व माझा भाऊ उच्च शिक्षण घेऊन समाजामध्ये अधिकारी म्हणून जो मान सन्मान घेत आहोत त्यामध्ये माझ्या या लाल परी चा सिंहाचा वाटा आहे कारण माझी आई एसटी महामंडळ मध्ये अकाउंटंट म्हणून कार्य करत होती आज ती सेवानिवृत्त झाली आहे त्यामुळे मी लहानपणापासून एसटी ऑफिस मध्ये जायची. आईच्या ऑफिस मधील सर्व लेडीज हळदीकुंकवाच्या कार्यक्रमानिमित्त रेस्ट हाऊस ला छान गेट-टुगेदर चा कार्यक्रम ठेवायचे त्यात ऑफिस मधील सर्व कर्मचाऱ्यांची मुलं आनंदाने बागडायचो. आम्ही सर्व चिल्लर फौज एकत्र जमलो कीदंगा मस्ती करण्यात ती खूप मज्जा यायची.... आजही आम्ही आम्ही सर्व कर्मचाऱ्यांची मुलं मुली एकमेकांच्या संपर्कात आहोत आणि जेव्हा आम्ही प्रत्यक्ष भेटतो किंवा फोनवर बोलताना त्या आठवणींना उजाळा देत असतो.. माझी आई बीड डिव्हिजन ऑफिसला पहिल्या मजल्यावर अकाउंट विभागात काम करायची मला आठवतं ऑफिसमध्ये प्रवेश केला की समोरच एक अतिशय सुंदर नाजूक आणि छोटीशी हुबेहू लाल परी( मॉडेल ) ठेवलेली होती... त्यावर तोटी असणारे पाण्याचे माठ ठेवलेले होते... छोटी लाल परी इतकी हुबेहूब होती की आम्ही मुलं प्रत्येक वेळेस तिच्याभोवती गिरट्या मारायचो तहान असो किंवा नसो छोट्या लाल परी वरील माठातलं पाणी पिण्यासाठी आम्ही चढाओढ लावायचो. , ऑफिसच्या बाजूलाच बस स्थानक असल्यामुळे तिथे भरपूर बस पाहायला मिळायच्या... बाजूला डेपो मध्ये पण भरपूर गाड्या पाहायला मिळायच्या... इतक्या सगळ्या मोठमोठ्या गाड्या पाहून कुतूहल वाटायचं .. पहिल्यांदा आईनेच आम्हाला गाड्यावरील लावण्यात येणारा फलक वाचायला शिकवलं.... तिने सांगितलं की गाडीच्या फलकावरचा पहिलं नाव म्हणजे गाडी कुठून निघाली आहे आणि दुसरं नाव म्हणजे गाडी कुठे जाणार आहे..... तेव्हा कुठे कळायला लागलं की ड्रायव्हर गाडी स्थानकात आल्यावर फलकाची अदलाबदल का करतात... एसटी कर्मचाऱ्यांच्या घरच्यांसाठी वर्षातून दोनदा जो फॅमिली पास मिळायचा त्यामध्ये आजी-आजोबा बहिण भाऊ घरातील सर्वच व्यक्तींना लाल परी जिथपर्यंत जाते तिथपर्यंत मोफत प्रवास असायचा. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये फॅमिली पास काढला की आजी आजोबांसोबत आमचा दौरा पंढरपूर ,तुळजापूरला, कोल्हापूर ,वेरूळ अजिंठा अशा ठिकाणी निघायचा... पंढरपूरला गेले की कैकाडी महाराजांचा मठ पाहिल्याशिवाय आमची तृप्ती व्हायची नाही... खूप मज्जा यायची..... खरच खूप सोनेरी दिवस होते ते. मला,आठवतं जेव्हा अभियांत्रिकी शिक्षणासाठी माझा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबादला येथे नंबर लागला तेव्हा मी फॅमिली पास काढून औरंगाबाद ते बीड महिनाभर अपडाऊन करायची. आपल्या स्टाफचे मुले म्हणून कंडक्टर पण आमची विशेष काळजी घ्यायची.. पाचोड,गेवराई आलं की चहा नाश्ता घेता का म्हणून आपुलकीने विचारायचे..... अशाप्रकारे आमच्या आईमुळे आमचं लालपरीशी लहानपणापासूनच अत्यंत घनिष्ठ नातं होतं आणि आजही आहे....
आम्हाला आमच्या या लाल परी बद्दल आजही खूप मोठी आत्मीयता वाटते . लाल परि वर कुठल् संकट आल्याची बातमी वाचली की आमच्या मनाची बेचैनी खूप वाढते... सुंदर सुंदर पडदे लावून मोठमोठ्या महामार्गाने व मोठमोठ्या शहरांना जोडण्यासाठीच दळणवळण करणाऱ्या खाजगी, बस पाहिल्या की ... खेड्यापाड्यात कच्च्या रस्त्यावरून धावणाऱ्या माझ्या लाल परीच्या मोठेपणाची जाणीव प्रकर्षाने होते...
माझ्या आईने आपली सेवा पूर्ती एसटी महामंडळातच पूर्ण केली आणि योगायोग म्हणजे माझा भाऊ पण आज एसटी महामंडळात अधिकारी म्हणून काम करत आहे. त्यामुळ एस. टी. म्हणजे प्रचंड मोठा व्याप आहे. एस.टी. चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ, वरिष्ठ अधिकारी, एस.टी चा कामगार वर्ग जो खऱ्या अर्थाने सर्व जबाबदाऱ्या सांभाळतो, कनिष्ठ वर्ग ( जे लाल परीची स्वच्छता करतात ) या सर्वांना जवळून पहाण्याची संधी लाभली. ही सगळी मंडळी खूप मनापासून एस.टी.साठी झटून कामे करतात.काळानुरूपे लाल परीचे पण रुपांतर शिवशाही, electric bus, या मध्ये होताना दिसत आहे.. आमच्या लाल परी होणारे बदल पाहून आमचे मन अभिमानाने भरून येते. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाच्या दरम्यान आज लाल परीला खूप मोठे चढउतार पहावे लागले.... आणि त्या दरम्यान सामान्य जनतेला खाजगी वाहनासाठीच्या प्रवास खर्चाचा जो चढ पहायला मिळाला तो इथे नमूद न केलेला बरा... म्हणूनच माझ्या लाल परीला "गरिबांचा रथ" म्हणून संबोधलं जातं.. पण पुन्हा एकदा ही लाल परी मोठ्या उमदीने भरारी घेतच आहे, तिच्या या भरारी घेण्यात अर्ध्या तिकिटाची जोड देऊन समस्त नारी वर्गाने हातभार लावला आहे.. त्यामुळे दिवसेंदिवस लाल परी च्या उत्पादनात वाढ होताना दिसत आहे...
आम्हा सर्वांची लाडकी लाल परी महिलांना अर्धे तिकिट, विद्यार्थी वर्ग, स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, खेळाडू, अंध, अपंग, अशा सुमारे २४ प्रकारच्या सवलती सवलती देऊन आपलं कार्य पार पाडताना दिसते.... अशा या त्यागी, अत्यंत सहनशील असणाऱ्या, 75 वर्षापासून लाखो जनतेला सुरक्षितपणे प्रवास घडून आणणाऱ्या आमच्या लाल परी ला 75 व्या वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा.... आणि दिवसेंदिवस तिची अशीच भरभराट होत राहो यासाठी आभाळभर शुभेच्छा !!!

# महिलांनो; उठा, पेटा आणि सक्षम व्हा...!

आधुनिक केसरी

**फर्क होता है खुदा और फकीर में फर्क होता है किस्मत और लकीर में अगर कुछ चाहो और न मिले तो समझ लेना, कुछ और अच्छा लिखा हैं हमारे तकदीर में. आज आपण बघतोय महिलांवर पावलो पावली अन्याय होतोय कधी आपल्या घराण्याला वंश नाही, कधी हुंडाबळी, कधी चारित्र्यावर संशय घेऊन आणि कधी प्रेमाच्या नावाखाली प्रत्येक महिलेवर अन्याय होतोच.**



आज प्रत्येक महिला ही सीता सावित्रीसारखी अग्नीपरीक्षा देतेय ती थोड जरी पुढं चालली तर ही काय काम करणार म्हणून तिचे प्रमोशन रोकणार. थोडं मन मोकळ्यापणाने बोलली तर लगेच चारित्र्य खराब आहे म्हणून तिला बदनाम करणार हे सर्व कधी संपणार.
महिलेला तिचं स्वतःचं हक्काचं स्थान कधी मिळणार ? जर कधी माहेरी गेली तरी ती परक्याच धन म्हणल्या जाते आणि सासरी आली तरी दुसऱ्याची पोर म्हणल्या जाते. एवढं सगळं सोसूनही बाई ही कमकुवत असं का ? स्त्रीया नाजूक असतात आणि पुरुष कणखर असतात. ह्या एकाच गोष्टीचा पुरुषांना गर्व आहे. पण कधी विचार केलाय का स्त्रीया ह्या नाजूक असतानाही घराला गोकुळ करतात. मरणाच्या दारात जाऊन घराला वंश देतात. तुमची मारहाण सहन करतात. तुम्हाला त्यांचा थोडा मोठा आवाजही सहन होत नाही. तरिही आपण म्हणतो स्त्रीया आणि पुरुष समान आहे. मुलींनो कष्ट करून स्वतःच्या कर्तृत्वाची उंची एवढी वाढवा की भविष्यामध्ये कोणावरही कोणत्याही गोष्टीसाठी अवलंबून राहण्याची गरज पडणार नाही. कितीही दुःख येवो पण आत्मविश्वास हा कमी होऊ देऊ नका.

**एक क्षण रडवून जातो एक क्षण हसवून जातो जीवनाच्या प्रवासात येणारा प्रत्येक क्षण हा काहीतरी नक्कीच शिकवून जातो.**



पूनम शिरगुळे,
पार्थी, ता. वैजापूर

जीवनाच्या प्रवासात फुलांपेक्षा काट्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. त्यामुळे ह्या प्रवासात चालताना स्वतःचे पाय एवढे घट्ट करा की काट्यांना फक्त टोचणं माहिती असतं, वेदना कळत नाही. एका बापाची गरिबी झाकण्यासाठी एका मुलाची गरज आहे. देशाची गरिबी झाकण्यासाठी स्त्रीयांची गरज आहे. पण ह्या देशाची कोणाला जाणीवच नाही, हीच तर खरी शोकांतिका आहे. प्रत्येक बांधवाला सांगावंसं वाटतंय, ती माय् आहे, जननी आहे. तिच्या मनाचा थोडा तरी विचार करा. प्रेमाच्या नावाखाली तिच्याशी खेळू नका, ती कमजोर नाही. ती आदीशक्ती आहे. ती माणसापेक्षा खूप कणखर आहे. महिलांनो उठा आणि पेटा. जर कुणी हात लावला तर जळून राख होईल, पण जर साथ दिली तर जीवनाचा आकार बदलेन, जर तुम्ही राख बनवू लागल्या तर ह्या वादळात कधी कुठे संपाल कळणारही नाही. समाज फक्त अन्याय करण्यासाठी पुढे आहे. न्याय देण्यासाठी कुणी नाही. दोन दिवसापूर्वी दिल्लीत साक्षी नावाची तरूणीची क्रूरपणे हत्या झाली, लोकं पाहत होते, पण तिची मदत कोणीच केली नाही. म्हणून सांगते महिलांनो उठा, पेटा आणि सक्षम व्हा...!

# गोपीनाथ मुंडे: अमोघ वक्तृत्व, अद्वितीय लोकनेता!




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**काळाच्या किल्ल्या कुणाच्याच हातात नाहीत! मृत्यु अटळ असून माणसाला तो कोणत्या वळणावर येऊन मिठी मारेल(?) याची अजिबात शाश्वती नाही! नियतीने कुणाच्या भाग्यात काय लिहिले आहे(?) हे कुणालाच माहित नाही, असे असले तरी इथे प्रत्येकजण आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर आकाशाला गवसणी घालण्यासाठी धडपडतोय! याच वैश्विक न्यायाने काही माणसं आपल्या दैदिप्यमान कार्य-कर्तृत्वाने आपले जगणे-जीवन जनमानसांच्या हृदयावर आरूढ होऊन वलयांकित करतात! दुर्दैवाने नियतीला हे पहावत नाही आणि ती माणसे अचानक कालवश होतात! त्यावर कुणाचाच विश्वास बसत नाही!**

याचप्रमाणे महाराष्ट्राची बुलंद तोफ, संघर्षपुत्र, जनतेच्या मनावर अहोकाल अधिराज्य गाजवणारे लोकनेते, केंद्रीय मंत्री नामदार गोपीनाथराव मुंडे आजपासून बरोबर नऊ वर्षापूर्वी एका अपघाताची शिकार होतात आणि तमाम जनतेला अश्रूंच्या महासागरात ढकलून आपण जगाचा निरोप घेतात! ही दुर्दैवी घटना वर्णन करायला शब्दकोशांत शब्दच सापडत नाहीत! नेमकं काय म्हणावं या नियतीला ? तो दिवस आठवला की; आज सुद्धा काहींच सुचत नाही. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब आपल्यात नाहीत हे आज सुद्धा मन मानायला तयार नाही! स्वर्गीय लिहावसं वाटत नाही! याच वेड्या मायेतून अनेक लोक, "परत या! परत या! मुंडे साहेब परत या!" अशा आर्त घोषणा देत असतात. ह्या घोषणा ऐकल्याबरोबर आपसूकच डोळ्यांच्या कडा पाणावतात! हुंदका दाटून येतो! खरंच, येतील का परत आमचे लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब ? असा उगीच प्रश्न पडतो वेड्या मनाला! आणि मग हळूच दुसरं मन समजावतं, "अरे वेड्या, एकदा गेलेली माणसं परत येत असतात का ?" आणि पुन्हा सुरु होतो तोच निराशेचा दुर्दैवी खेळ!

जगाच्या इतिहासात अगदी सामान्य परिस्थितीतून येवून असामान्य कर्तृत्व गाजवणारी, आपली वेगळी ओळख निर्माण करणारी बोटावर मोजण्याएवढी माणसं आहेत! कोणतेही आर्थिक अथवा राजकीय पाठबळ नाही. अशा खडतर परिस्थितीत या माणसांनी आपल्या दुर्दम्य आत्मविश्वासाच्या बळावर जगाच्या इतिहासात आपले नाव कोरले! त्यापैकीच नव्या पिढीतील गाजलेले नाव म्हणजे स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे! महाराष्ट्रातील उसतोड कामगारांचा मागास जिल्हा म्हणून ओळख असणाऱ्या बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील नाथ्रा सारख्या ८० टक्के माळरानाच्या शिवारातून गोपीनाथ मुंडे नावाच्या झंजावाताचा उदय झाला. स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकांत जन्मलेले गोपीनाथ मुंडे म्हणजे संघर्ष! नाथ्रा ते केंद्रीय मंत्रिपदांपर्यंतचा प्रवास एका लेखात लिहिण्यासारखा नक्कीच नाही! अंबाजोगाईच्या महाविद्यालयातून सुरु झालेला त्यांचा प्रवास सर्वांनाच थक्क करणारा आहे! दुर्दैवाने वडील लवकर गेले परंतु पुढील शिक्षणाची जबाबदारी जेष्ठ बंधू श्री पंडितअण्णानी सक्षमपणे पार पाडली. दुसरीकडे विद्यार्थी संसदेच्या निवडणुका, जनसंघ आणि शेवटी भाजपाच्या प्रचारकार्यात प्रवेश केला. शेठजी-भटजींचा पक्ष असलेल्या भाजपला मुठभर लोकांतून बाहेर काढून खेड्यापाड्यात-तांडा-वाडी-वस्ती-चारा छावणीपर्यंत पोहचवले. बाहेर प्रचार करतांना गोपीनाथराव मुंडेंचे लक्ष आपल्या परळीवर होतेच. त्यात १९७८ च्या बीडच्या जि.प. निवडणुकीत अंबाजोगाईच्या उजनी गटातून ते बीड जिल्हापरिषदेवर निवडून आले आणि पुन्हा मागे वळून पहिलेच नाही! पुन्हा १९८० मध्ये विधानसभा निवडणुका लागल्या. तिशीतील गोपीनाथराव परळी मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवली आणि जिंकली सुद्धा! पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून भाजपच्या नावाखाली निवडून येण्याचा सन्मान श्री गोपीनाथराव मुंडेंना मिळाला! त्यानंतर एकावर एक संधी त्यांना मिळत राहिल्या आणि त्यांनी त्या सर्वच संधींचे सोने केले. पुढे भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष, भाजपचे प्रदेशाध्यक्ष अशा एक ना अनेक संधी त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर मिळाल्या. या पदांचा फायदा मुंडे साहेबांनी आपल्या पक्षाला मोठ्याप्रमाणात करून दिला.



श्रीमंत आणि उच्चभ्रू लोकांमध्ये असलेला शेटजी-भटजींच्या भाजपची पाळेमुळे बहुजन समाजाच्या मनामनात खोलवर रुजविली! मुंडे साहेबांनी राजकारणात अनेक दैवी वरदान असल्यासारखे कार्य करून दाखवले.


भाजपकडे अठरापगड जातींच्या लोकांना चुंबकासारखे खेचण्याचे काम मुंडेंनी केले. बहुजन समाजासाठी राजकारणात असलेला अवकाश मोठ्या शिताफीने मुंडे साहेबांनी भरून काढला. साळी-माळी-धनगर-बंजारा-वंजारी-मुसलमान सारख्या वंचित जाती-धर्माच्या लोकांना देशाच्या मुख्य राजकीय प्रवाहात खेचून आणण्याचे महान कार्य गोपीनाथराव मुंडे साहेबांनी केले! एवढेच काय उपेक्षित आणि दुर्लक्षित मराठा समाजाच्या नव्यानेतृत्वालासुद्धा भाजपमध्ये संधी देऊन सर्व जातींची एक मजबूत मोट बांधण्याचे कार्य गोपीनाथरावांनी केले. विविध पदांवर काम करतांना १९९२ ते १९९५ काळात गोपीनाथरावांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधीपक्षनेता म्हणून तमाम महाराष्ट्राला ओळख करून दिली. गोपीनाथराव उपेक्षितांचा चेहरा बनले. यासाठी त्यांनी कठोर परिश्रम घेतले. रात्रंदिवस प्रवास, खेड्यापाड्यातील सामान्य माणसांच्या भेटीगाठी घेऊन जनसामान्य लोकांमध्ये आत्मविश्वास जागृत केला. लाखोंच्या सभा जिंकण्याचे कसब, खडा आवाज, भारदस्त व्यक्तिमत्व, ग्रामीण आणि शहरी लोकांची नाडी पकडून-लोकांचा प्रतिसाद घेऊन बोलण्याच्या, संभाषण कलेच्या देणगीने गोपीनाथरावांनी संपूर्ण महाराष्ट्रात आपली ओळख निर्माण केली. अल्पावधीत मुंडे महाराष्ट्रातील ओबीसी-वंचित-शोषितांचा चेहरा झाले. १९९४ च्या संघर्ष यात्रेतून गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, जळगावचे सेक्सस्कँडलयावर महाराष्ट्रभर रान उठवले. सरकारवर घणाघाती हल्ले चढवून मुंडे नावाच्या वादळात भल्याभल्यांचे राजकीय मनसुबे धुळीला मिळवले! कळस म्हणजे मुंडे साहेब दोनवेळा बीड मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. सुदैवाने केंद्रात भाजपचे बहुमत आले आणि श्री नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात गोपीनाथरावांना केंद्रीय ग्रामविकासमंत्री हे कॅबिनेट मंत्रिपद मिळाले! दुर्दैवाने हा आनंद जास्त काळ टिकू शकला नाही, ३ जून रोजी मुंडे साहेबांचे अपघाती निधन झाले! महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठी पोकळी निर्माण झाली. राजकारण-जात-धर्मापलीकडे आपली ओळख निर्माण करणारा लोकनेता काळाने हिरावून नेला!

आज मुंडे साहेबांसारखा तडाखेबंद लोकनेता कुठेच दिसत नाही. फेसबुक, ट्विटर, इंस्टावर नुसती टीवटीव चालू आहे. सभा-भाषण ऐकायला लोक दुरून येत. हिंदुह्रदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे, स्व.अटलबिहारी वाजपेयी, स्व.प्रमोद महाजन, स्व.विलासराव देशमुख, स्व.गोपीनाथ मुंडे सारख्या तळागाळातून उगवलेल्या नेतृत्वाची आज महाराष्ट्राला नितांत गरज आहे! सावधान गडयांनो! विद्यमान काळात राजकारण कूस बदलत असून नवनवीन राजकीय समीकरणात मतदार गोंधळून गेला आहे. तमाम महाराष्ट्राचे भले करणारे सर्वसमावेशक नेतृत्व आज दिसत नाही. आपापल्या अस्तित्वासाठी धडपड चालू आहे. लोकप्रश्नांची जाण असणाऱ्या, सामान्यांचे अश्रू पुसणाऱ्या लोकनेत्याची आज महाराष्ट्र वाट पाहतोय! संकुचित राजकारणात प्रचंड भ्रष्टाचार, कट्टरता आणि स्वार्थ बोकाळला आहे. राजकारणातील समाजकारण बाजूला गेले आहे. परंतु केवळ भावनेने पोट भरत नाही. तेंव्हा, मुंडे साहेबांप्रती निष्ठा ठेवून युवा पिढीने काळाची पावले ओळखून आपले जीवन आचार-विचार-उच्चार संपन्न केले पाहिजे. शिक्षण-व्यावसायिकता याकडे लक्ष द्यायला हवे. व्यसन, मोबाईलचा अतिवापरावर नियंत्रण ठेवावे लागेल. जात-धर्म-पंथ बाबतीत कट्टरता नको. एखाद्या नेत्याचे कार्यकर्ते होऊन व्यसनी होण्यापेक्षा आपण आपल्या घरचे कर्तेधर्ते होऊया! मुरत से किरत भली, बिन पंख उड जाए, मुरत तो जाती रही, किरत कभी न जाए! स्वतः

# राजीव गांधी- माणुसकीचा झरा

आधुनिक केसरी

**चाळीस-एक वर्षं झाली असतील. दिल्ली विमानतळावर मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांसाठी उदघोषणा करण्यात येत होती, की मुंबईला टॅक्सींचा संप आहे, तरी प्रवाशांनी याची नोंद घ्यावी. परिस्थिती सामान्य असतांनासुद्धा मुंबईत एअरपोर्टवर टॅक्सी मिळवणे म्हणजे महाराष्ट्र राज्य लॉटरी लागण्याचा योग. त्यांत संप म्हणजे ...आधीच उल्हास आणि दिल्लीहून आलेले इंडियन एयरलाईन्सचं फ्लाईट मुंबई विमानतळावर उतरलं. ज्या प्रवाशांच्या गाड्या हजर होत्या, ते भराभर घरी निघून गेले. इतर सुज्ञ लोकांनी बसच्या रांगेत आराधना करायला सुरवात केली. असाच एक ज्येष्ठ नागरिक वर्गातला प्रवासी आपली सुटकेस घेवून थकलेली पावले बस स्टॉपच्या दिशेने ओढत चालला होता. त्याच्या बाजूने अनेक खाजगी वाहने भुर्रकन जात होती. पण निदान त्या कसोटीच्या दिवशी आपले वाहनथांबवून त्या सज्जनाला लिफ्ट द्यावी, असे कोणालाही वाटत नव्हते.**



तेवढ्यांत एक गाडी त्या माणसाच्या जरा पुढे जावून थांबली. गाडीवर इंडियन एयरलाईन्सचा लोगो होता. दरवाजा उघडून गाडीत बसलेल्या कॅप्टनने त्या प्रवाशाला विचारले "कुठे जाणार आपण ? गाडीत बसा. मी आपल्याला सोडण्याची व्यवस्था करतो". त्या थकलेल्या प्रवाशाला हा कॅप्टन म्हणजे देवदूतच वाटला. त्याचे आभार मानत तो गाडीत बसला. कॅप्टनला शिवाजीपार्कच्या त्याच्या घरी जायचे होते. तर या प्रवाशाला साहित्य सहवास कॉलनी-बांद्रा. कॅप्टनने त्याला सांगितले की प्रथम शिवाजीपार्क इथे जावे लागेल, कारण त्याला एक महत्वाचा फोन करायचा होता. त्याप्रमाणे त्या दोघांना ड्रायव्हरने शिवाजीपार्कला सोडले. कॅप्टनने घरी पोचल्यावर त्या प्रवाशासमोर सँडविच व कॉफी ठेवली व फोनवरचे आपले संभाषण संपल्यावर, तो या प्रवाशाला म्हणाला "आपल्याला थोडा वेळ थांबावे लागले, त्याबद्दल क्षमस्व. आता आमचा ड्रायव्हर आपल्याला घरी सोडेल. त्याप्रमाणे त्याने ड्रायव्हरला सूचना दिल्या. निघतांना त्या अनोळखी प्रवाशाने कॅप्टनला धन्यवाद दिले व म्हणाला "आपले फार उपकार झाले. आज संप होता. तुम्ही मदत केली नसती तर खूप हाल झाले असते. आपलं नांव काय ?" " राजीव गांधी" कॅप्टनने उत्तर दिले. तो प्रवासी होता सुप्रसिद्ध मराठी लघुकथाकार/साहित्यिक अरविंद गोखले. आणि तो कॅप्टन, त्यानंतर कांही वर्षांतच आपल्या देशाचा पंतप्रधान झाला.

वर उल्लेखिलेला प्रसंग हा मा. राजीव गांधी यांच्यातील माणुसकीचा स्रोत दाखवणारा एकमेव प्रसंग नव्हे. इंडियन एयरलाईन्सच्या सेवेत असताना, ते जेव्हा जेव्हां मुंबईला येत तेव्हां तेव्हां, समोर येईल त्याच्याशी हंसून त्याला अभिवादन करायची ( समोरच्या माणसाची ग्रेड, हुद्दा कशाचाही भेदभाव न बाळगता ) त्यांची आगळी वेगळी शैली होती. माणसांत रमणारा हा माणूस. ते माननीय इंदिरा गांधी यांचे सुपुत्र आहेत, हे आमच्याकडे अनेकांना माहित नव्हते. सर्वजण त्यांना 'कॅप्टन गांधी' या नांवानेच ओळखत. ते कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाल्यावर प्रथमच मुंबईला आले, तेव्हां एयरपोर्टवर त्यांना विमानाजवळ भेटायला मुंबई कॉंग्रेसचे बडे पदाधिकारी आले होते. त्यांचे आपसांत बोलणे सुरु असतांना, आमच्याकडच्या डी. बी. नायक नांवाच्या कर्मचाऱ्याने त्यांना पाहिले. आणि त्याने तिथूनच "हाय !! कॅप्टन गांधी !! लॉंग टाईम.. नो सी" असे म्हणत हात उंचावून फ्रेंडली सलामी दिली. राजीव गांधी यांनी त्याच्याकडे पाहिले आणि त्या पक्षाच्या मान्यवरांना तिथेच सोडून त्यांनी डी.बी. नायककडे येऊन दिलखुलास हंसून, त्याच्याशी हात मिळवला. आणि नायकला त्यावेळी पत्ताही नव्हता की आपल्या कॅप्टन गांधींना भेटायला एवढी खादीधारी माणसे विमानाजवळ कां आली आहेत. आमच्याकडे वाघ नांवाचे ड्रायव्हर ग्राउंड सपोर्ट डिपार्टमेंटला होते. त्यांचा मुलगा इंडियन एअरलाईन्समध्येच हंगामी तत्वावर लोडर म्हणून काम करत होता. वाघ निवृत्त झाल्यावर त्यांचा हा एकमेव कमावता मुलगा. हंगामी कर्मचारी म्हणजे अळवावरचे पाणी. केव्हां हातात नारळ मिळेल, त्याचा भरवसा नाही. मुलाची काळजी करून करून वाघ अधिकाधिक वयस्कर होत चालले होते. अखेरीस त्यांनी मनाचा हिय्या केला. दिल्लीचा विमानाचा पास घेवून ते दिल्लीला रवाना झाले. तिथून थेट त्यांनी पंतप्रधानाच्या निवासस्थानाकडे मजल मारली. पण तिथे त्यांना सुरक्षा रक्षकांनी अडवले. चौकशी सुरु झाली. वाघ त्या सुरक्षा रक्षकांना परत परत एकच सांगत होते. "मी मुंबईहून आलो आहे. कॅप्टन गांधीना भेटल्याशिवाय मी जाणार नाही. त्यांना फक्त एवढाच निरोप द्या, की मुंबईहून इंडियन एअरलाईन्सचा ड्रायव्हर वाघ त्यांना भेटायला आला आहे. अर्जंट काम आहे."

त्यावेळी मा. राजीव गांधी आपल्या देशाचे पंतप्रधान होते. त्या सुरक्षा रक्षकांना काय सुबुद्धी झाली देव जाणे, त्यांनी आंत राजीव गांधी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला. तिथून हिरवा कंदील मिळाल्यावर, वाघसाहेबांना बैठकीच्या जागेत सुरक्षा रक्षकांच्या तैनातीत आणण्यात आले. राजीव गांधी तिथेच बसलेले होते. वाघ यांनी आपली कर्मकहाणी राजीव गांधी यांना सांगितली. आपण निवृत्त झालो आहोत व आपला मुलगा हा एकमेव कमावता व कुटुंबाचा आधारस्तंभ आहे हे स्पष्ट केले. आणि तो गेली कांही वर्षे हंगामी लोडर म्हणून काम करीत आहे हेही सांगितले व त्याला इंडियन एयरलाईन्समध्ये कायमस्वरूपी नोकरी मिळाली तर मी निवृत्तीनंतरचा काळ शांतपणे घालवू शकेन, असे डोळ्यांत पाणी आणून सांगितले. पूर्वी राजीव गांधी फ्लाईट घेवून जेव्हां मुंबईला येत तेंव्हा बहुतेक वेळा त्यांना गाडीने घरी सोडणे/परत आणणे, या ड्यूटीवर वाघ यांचीच नेमणूक होत असे. त्यामुळे त्यांची चांगलीच ओळख होती. पण तरीही प्रोटोकॉल बाजूला ठेवून एका पंतप्रधानाने , सामान्य माणसाला भेटणे हा एक अभूतपूर्व योग होता. 'आपल्याकडून जे कांही होईल, ते सर्व आपण करू' असे आश्वासन मा. राजीव गांधीनी वाघ यांना दिले. त्यानंतर पंतप्रधानांच्या कार्यालयातून वेगाने हालचाली सुरु झाल्या. इंडियन एयरलाईन्सच्या सी.एम.डी.च्या कार्यालाशी संपर्क करून त्यांना योग्य त्या सूचना देण्यांत आल्या. त्या सुचना मुंबई ऑफिसपर्यंत पोचल्या. वाघ सांताक्रूझला एका सामान्य वस्तीत रहात होते. इंडियन एयरलाईन्सच्या सिक्युरिटी विभागाच्या स्टाफने वाघ यांच्या घरी रात्री दहाच्या सुमाराला जावून त्यांच्या मुलाला ओल्ड एअरपोर्टच्या शासकीय विभागात आणले. तिथे त्याच्या नेमणुकीसंदर्भात सर्व प्रक्रिया पर्सोनेल ऑफिसरच्या उपस्थितीत पूर्ण करण्यांत आल्या. वाघ यांच्या मुलाची वैद्यकीय तपासणी करण्यांत आली व त्याला लगेच नेमणुकीचे पत्र देण्यांत आले. दुसऱ्या दिवशी वाघ मुंबईला आपल्या घरी पोंचले तेव्हा त्यांचे चिरंजीव इंडियन एअरलाईन्सचे कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून कार्गो विभागांत कामावर रुजू झाले होते. ही संपूर्ण घटना कदाचित् अतिशयोक्तपूर्ण वाटेल. पण हे सत्य आहे. हा 'एक न भूतो, न भविष्यती' असा अनुभव होता. कोणे एके काळी आपल्याला गाडीने घरी सोडणारा व पुन्हा एअरपोर्टवर आणणारा एक ड्रायव्हर....पण त्याचे दुःख, त्याच्या समस्या, वेदना समजून घेणारा माणूस, या देशाचा पंतप्रधान होता. पण त्याहूनही तो एक देवदुतासमान संवेदनशील माणूस होता. आपल्या अधिकाराचा उपयोग गरीबाच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी करायला हवे, याचे भान त्याला होते. आमचे दुर्दैव हेच की २१मे१९९१मध्ये कांही नीच नराधमांनी त्याच्यावर क्रूर घाला घातला. हा कट रचणाऱ्याना काय मिळाले, तो परमेश्वर जाणे. पण आपल्या देशाचे मात्र अपरिमित नुकसान, त्या मारेकऱ्यांनी केले. कॅप्टन गांधी, आमच्या स्मृतीत तुम्ही सदैव एक प्रेरणास्रोत म्हणून रहाल.

अनिल रेगे, मो : ९९६९६१०५८५.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर
जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली,
शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

Walsekar Metal Private Limited
Manufacturer of Aluminium Alloy Cas ting
Address : K-58, MIDC AREA WALUJ, AURANGABAD-431136

# फुलंब्रीत तीन कृषी केंद्रांवर विक्री बंद आदेशाची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** खरीप हंगामाने जोर पकडला असून एक जून पासून कापसाच्या बियाण्याच्या विक्रीला सुरुवात करण्यात आलेली आहे. परंतु काही कृषी केंद्र कापूस बियाण्याची नियमबाह्य विक्रीतकरत असल्याचे फुलंब्री येथील भरारी पथकाला तपासणी दरम्यान दिसून आल्याने शुक्रवार दिनांक 2 जून रोजी तीन कृषी केंद्रांवर ती विक्री बंद आदेशाची कारवाई करण्यात आली. सदर बियाण्याचे कंपनीकडून कृषी केंद्राला विक्री करण्याची परवानगी नसतानाही सदर बियाणं पाकीट कृषी केंद्र आढळल्याने ही कारवाई करण्यात आली असून गणेश कृषी सेवा केंद्र, ताजकिसान कृषी सेवा केंद्र व संजय फर्टीलायझर्स या दुकानांमध्ये विक्री बंदचे आदेश तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी दिले येणाऱ्या दिवसात कारवाई अजून कठोर करण्यात येईल असे निर्देश याद्वारे कृषी विभागाने सर्व कृषी सेवा केंद्र चालकांना दिले आहे .सदर तपासणी भरारी पथकात मंडळ कृषी अधिकारी निवृत्ती घरी व कनिष्ठ लिपिक विखार शेख यांचा समावेश होता..



# शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील नगरपालिका वैजीनाथ वाचनालयात शुक्रवार( ता,०२ )रोजी शिवराज्याभिषेक दिन सोहळ्या निमित्त वाचक वर्ग व जेष्ठ नागरिक यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्प करून अभिवादन केले,वाचक नितीन गोटीराम शिंदे यांनी प्रथम पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले,ग्रंथपाल डी,डी,दळे यांच्या उपस्थितीत जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, सुभाष चाफेकर,राधकीसन सोनवणे,फेरोज खान यांनी अभिवादन केले,या समयी सुनील जाधव,विशाल गाढे,अमोल घनश्याम वाणी, प्रवीण देशपांडे, एस, व्ही,राजपूत, भरत वैद्य यांनी शिवाजी महाराज यांचा व शिवराज्याभिषेक दिनाचा जय घोष केला,श्री शिंदे यांनी माहिती दिली, शेवटी संजय राजपूत यांनी आभार मानले.



# पाथ्री येथे अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**पाथ्री :** तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची 298 जयंतीनिमित्त भव्य दिव्य पालखी सोहळा आयोजीत केला होता अहिल्याबाई होळकर पुतळा ते गावामधुन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ग्रामपंचायत पाथ्री भव्य मिरवणूक झाली. या पालखी सोहळ्यामध्ये गावांमधील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव पाथ्रीकर महानंद दुध संचालक राजेंद्रभाऊ पाथ्रीकर सरपंच वर्षाताई पाथ्रीकर सर्व समाज बांधव तरुण मंडळ महिला मंडळी समस्त ग्रामस्थ भजनी मंडळी वारकरी गावकरी उपस्थित होते.



# जालना जिल्ह्यातील गुन्हेगारांवर कारवाई करावी

## मनसे जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** पोलीस अधीक्षक यांचे दि.२ जून रोजी जालना यांचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी पूर्णा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू चोरी होत असल्यामुळे जिल्हाध्यक्ष यांनी निवेदन देऊन कारवाईची मागणी करण्यात आली. त्याचबरोबर जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना मनसे अध्यक्ष श्रीमान राज ठाकरे, यांच्या आदेशावरून व मनसे नेते मा.दिलीप बापू धोत्रे मराठवाडा संपर्क अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली आमचे पक्ष म्हणून पूर्ण सहकार्य आहे, परंतु कायदा हातात घेऊन काम करणाऱ्या लोकांना कठोर कारवाई करण्यात यावी अशी अपेक्षा ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली, पोलीस अधीक्षक यांच्या स्वागता वेळी मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके. रवी भैय्या राऊत. बळीराम खटके. उपजिल्हाध्यक्ष शरद मांगदरे, शहराध्यक्ष जालना,राहुल रत्नपारखे, मनविसे बाळासाहेब काळे,सचिव विलास तिकांडे,महेश नागवे महिला जिल्हाध्यक्ष,सौ. रेखाताई पाखरे, महिला शहराध्यक्ष सौ. वंदनाताई खांडेभराड, सतिश खांडेभराड,गिरी नाना इतर मनसे पदाधिकारी उपस्थित होते.



# अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त जय मल्हार मित्र मंडळ विजयनगर मल्हार चौक यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन यळकोट यळकोट जय मल्हार या जयघोषात आरती करण्यात आली.. त्याप्रसंगी सर्वत्र अवघे वातावरण प्रसन्न झाले, जय मल्हार जय अहिल्या या जयघोषात युवाशिवशाहीर पवन महाराज खाडे यांनी पोवाडे शाहीरी थाटात सादर केले, तसेच मा.कॅबिनेट तथा सहकार मंत्री अतुलजी सावे साहेब यांनी सर्व समाजबांधवांना अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या शुभेच्छा मोबाईल फोन ध्वनीद्वारे दिल्या. त्याप्रसंगी समितीचे अध्यक्ष प्रमोद खाडे,ईश्वर शिंदे, सचिव शिवाजी ढेपले, भगवानराव शिंदे,बाळकृष्ण शेवंते, सखाराम भोजने ,विजय भाऊ पवार,पिराजी गोरे, परमेश्वर शिंदे,शिवाजी काळवणे ,सिद्धेश्वर काकडे व प्रमुख अतिथी लहुजी शेवाळे साहेब, रविभाऊ वैद्य नगरसेविका विमलताई केंद्रे व ज्योतीताई मोरे,नलिनीताई खाडे ,चैताली ताई मान्यवर उपस्थितांनी अहिल्यादेवींना अभिवादन केले व अहिल्यादेवींचा इतिहास समाजापर्यंत असाच पुढे नेत राहणार असे सांगितले.



# पोलिसांचा जुगार अड्ड्यावर छापा 30 लाखांचा मुद्देमाल ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील आनंद नगर,म्हसोबा चौक, वैजापूर येथील एका घरात सुरू असलेल्या तिरट नावाच्या जुगार अड्डयावर पोलिसांनी छापा टाकून जुगार खेळणाऱ्या 20 जणांना अटक केली.यात तब्बल 30 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वैजापुर शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील आनंद नगर, म्हसोबा चौक, वैजापूर येथे काही व्यक्ती जुगार खेळतात अशी गोपनिय माहिती सहायक पोलीस अधिक्षक महक स्वामी यांना मिळाली . मिळालेल्या माहितीनुसार सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया, अप्पर पोलीस अधिक्षक सुनील लांजेवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधिक्षक महक स्वामी उपविभाग वैजापूर यांच्या पथकाने दिनांक 01 मे गुरूवार रोजी सायंकाळी 06.15 वाजेच्या सुमारास रेल्वे स्टेशन रोडवरील आनंद नगर, म्हसोबा चौक, वैजापूर येथे छापा टाकला. सदरील ठिकाणी पत्त्यावर पैसे लाऊन तिर्रट नावाचा जुगार खेळ खेळतांना मिळुन आले. यात एकूण 20 जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्या ताब्यातुन रोख रक्कम 79,637/- रुपये चार चाकी वाहने 04, मोटरसायकल 13, एक बुलेट, 12 मोठे मोबाईल,4 छोटे मोबाईल व इतर साहित्य असे एकूण 30 लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया, अप्पर पोलीस अधिक्षक सुनील लांजेवार,उपविभागीय पोलीस कार्यालय वैजापूर च्या सहायक पोलीस अधिक्षक महक स्वामी यांच्या मार्गदर्शना खाली एपीआय बनसोड, पीएसआय श्रीराम काळे, हे.कॉ. गोलवाल, महिला पो ना. वर्षा गाडेकर,महिला पो.ना. सविता मोटे, पो.ना. शिवनाथ सरोदे, पो.कॉ.मोना पवार,पो.कॉ.संजय घुगे, पो.कॉ.अमोल मोरे,पो.कॉ.गोपाल जोनवाल यांनी केलेली आहे.

## कल्पना म्हापूसकर यांचा कल्पदीप काव्यसंग्रह प्रकाशित होणार!

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** साहित्यसंपदा प्रकाशनातर्फे कल्पना म्हापुस्कर ह्यांचा "कल्पदिप " काव्यसंग्रह प्रकाशित होणार आहे. अवघ्या तीन वर्षात ५७ पुस्तके साहित्यसंपदा प्रकाशनातर्फे प्रकाशित झाली आहेत. जेष्ठ नागरिक संघ बोरिवली येथे प्रकाशन सोहळा दिनांक ३जुन २०२३ रोजी सकाळी १० ते १ वेळेत पार पडणार आहे. सुप्रसिद्ध लेखिका स्वाती चांदोरकर ह्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन पार पडणार आहे. मराठी साहित्यातील अजरामर पर्व व पु काळे ह्यांच्या त्या कन्या असून ,प्रकाशनाच्या निमित्ताने व. पुं.च्या स्मृतींना उजाळा मिळणार असून श्रोत्यांना त्यांच्याशी संवाद साधता येणार आहे.प्रकाशन सोहळ्यास साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे,जेष्ठ पत्रकार रवींद्र देशमुख,लेखिका स्वाती शृंगारपुरे ,निवेदिका पूजा काळे ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. योगेश गोतारणे ह्यांच्या खुमासदार निवेदनाची साथ कार्यक्रमास लाभणार आहे.काव्यसंग्रह प्रकाशनाच्या निमित्ताने निवडक कवयित्रींचे काव्यवाचन पार पडणार असून "मनातली पाने" या आपल्या काव्यसंग्रहातील कविता सलोनी बोरकर ,"कविता मनातली " काव्यसंग्रहाच्या कवयित्री कविता झुंजारराव आणि इतर नवकवींचा देखील उत्स्फूर्त सहभाग असणार आहे.




## महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे हे 34 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर बुधवारी ( 31 मे ) निवृत्त झाले. पावणेदोन वर्षांपासून ते महावितरणच्या औरंगाबाद शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत होते. महावितरणच्या वतीने त्यांना समारंभपूर्वक निरोप देण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे होते. तर मंचावर औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले, मध्य प्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक सचिन तालेवार, मुख्य अभियंता भुजंग खंदारे, महापारेषणचे माजी संचालक उत्तम झाल्टे, निवृत्त मुख्य अभियंता अनिल भोसले, किशोर परदेशी, अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, संतोष सांगळे उपस्थित होते. यावेळी प्रकाश जमधडे व त्यांच्या पत्नी अनिता जमधडे यांचा महावितरणच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व वक्त्यांनी जमधडे यांच्या महावितरणमधील कारकिर्दीबद्दल गौरवोद्गार काढले. ग्राहकांना सेवा देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची तसेच महावितरणबाहेर केलेल्या सामाजिक कार्याची त्यांनी वाखाणणी केली. मनोगत व्यक्त करताना जमधडे यांनीही महावितरणमध्ये काम करताना जनतेची सेवा करता आल्याचे समाधान व्यक्त केले. कनिष्ठ अभियंता ते अधीक्षक अभियंता अशा विविध पदांवर काम करताना कंपनीतील अधिकारी-कर्मचाऱ्यांसह ग्राहकांचे मोलाचे सहकार्य लाभले. औरंगाबाद शहरात सुरळीत वीजपुरवठ्यासह ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासाठी प्रयत्न केल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमास जमधडे यांचे कुटुंबीय व मित्रपरिवारासह महावितरणचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गिरीजा नदीच्या पात्रातून वाळूची चोरटी वाहतूक सुरूच

### महसूल विभागाचे दुर्लक्ष; शासनाचे लाखोंचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**वडोदबाजार:** नदीच्या पात्रातून हवे ते वाळूची वाहतूक थांबवण्यात यावी व वडोद बाजार येथे शासकीय वाळू साठा तयार करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

वडोद बाजार परिसरात असलेल्या गिरजा नदीच्या पात्रातून दररोज रात्री वाळूची मोठ्या प्रमाणात चोटी वाहतूक सुरू असते रात्री आठ वाजेपासून सकाळी सात वाजेपर्यंत दररोज ट्रॅक्टर द्वारे गिरजा नदीच्या पात्रातून वाळूची चोरटी वाहतूक सुरू असून या चोरट्या वाहतुकीमुळे शासनाच्या लाखो रुपयाचा महसूल बुडत आहे व सामान्य नागरिकांना स्वस्त धरणात शासनाची मिळणारी वाळू मिळत नसल्याने या वाळू तस्करांचे व्यवसाय चांगलेच व्यवसाय जोरात सुरू आहे दररोज रात्री वाळूची चोरटी वाहतूक करून बांधकामासाठी पुरवली जाते मात्र या चोरटे वाळूच्या वाहतुकीतून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. महसूल विभागाने या हवे ते वाळूच्या वाहतुकीवर कारवाई करणे गरजेचे आहे दररोज रात्री वाळूची वाहतूक सुरू होत असल्यामुळे रात्रभर ट्रॅक्टरचा खडखडा डावा सुरू असतो त्यामुळे आवाज सुरू असतो यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहे महसूल विभागाने यावेद्य वाळूच्या वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करणे गरजेचे आहे.

यामुळे शासनाच्या लाखो रुपयाचा महसूल बुडत आहे वडोद बाजार चे मंडळ अधिकारी यांना निलंबित करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुका अध्यक्ष रमेश धनके यांनी अवैध्य वाळूच्या चोरटी वाहतुकी बाबत माहिती देण्यासाठी संपर्क साधला असता मंडळ अधिकारी यांनी प्रतिसाद दिला नाही महसूल विभागाचे अधिकारी रात्रीच्या वेळी फोन केल्यास प्रतिसाद देत नाही. त्यामुळे महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे अवैध्य वाळूच्या वाहतुकीला वाव मिळत आहे . गिरजा नदीच्या आयोध्या वाळू वाहतुकीमुळे शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल उडत असून , गिरजा नदीच्या पात्रातून वाळूची अवैध वाहतूक सुरू असून वडोदबाजारचे मंडळ अधिकारी महसूल तलाठी हे वाळूच्या वाहतूक करणाऱ्या वर कारवाई करण्यासाठी दिरंगाई करत असून यांची बदली करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे ( तक्रार ) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष रमेश धनके यांनी निवेदनाद्वारे विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली आहे महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन यावेद्य वाळू वाहतूक करणाऱ्या वर कारवाई करण्यात यावी व वडो द बाजार येथे शासकीय वाळू साठा तयार करण्यात यावा फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे शासकीय वाळू साठा तयार करण्यात यावा अशी मागणी आता ग्रामस्थांकडून होताना दिसत आहे शासनाच्या स्वस्त दरात मिळणाऱ्या वाळू चा नागरिकांना फायदा होईल व शासनाला महसूल प्राप्त होईल .

## सोयगाव तालुक्यात पालकांची शहराकडे धाव; भर उन्हात गुरुजी विद्यार्थ्यांच्या शोधात

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात ग्रामीण भागातील पसरलेला शैक्षणिक दर्जा,आधुनिक शिक्षण पद्धतीची वाणवा, ग्रामीण भागातील शिक्षकांचे शहरी वास्तव्य असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांची शहराकडे धाव घेताना दिसून येत आहे. सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात ग्रामीण भागातील शिक्षकांना मात्र वाढलेल्या तापमानात फक्त तुकडी व नोकरी टिकवण्यासाठी घरोघर फिरावे लागत आहे. शाळा सुरू होण्यास अद्याप कालावधी असला तरी ग्रामीण भागातील शाळांना विद्यार्थ्यांची लागलेली गळती पाहता आतापासूनच शाळांनी विद्यार्थ्यांचा शोध घेण्यास सुरूवात केली आहे. शिक्षकांची मुले शहरात व शहरातील नामांकित शाळेत, नामांकित शिकवणी वर्गाला तर शेतकरी व सर्वसामान्यांची मुले ग्रामीण शाळेत असा विरोधाभास सोयगाव तालुक्यात पहावयास मिळत आहे. शिक्षकांसह पालकांचा शहराकडे वाढत असलेला ओढा पाहता ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटत असल्याचे चित्र सहज पहावयास मिळत आहे. ग्रामीण शाळांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध विद्यार्थीसंख्या मर्यादित अन् शाळांची संख्या अधिक झाल्याने व त्यातच इंग्रजी माध्यमांच्या वाढते प्राबल्य यामुळे शाळांना सुरुवात होण्यापूर्वीच ग्रामीण शिक्षकांनी पालकांशी संपर्क साधत आहेत. विद्यार्थ्यांच्या शोधाऐवजी शैक्षणिक दर्जा सुधारावा केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यावरच लक्ष केंद्रित करत मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे कायम दुर्लक्ष करणारे गुरुजी आज तालुक्यात पहावयास मिळत आहेत. त्यामुळे पालकांचा कल मुलांचा दर्जा सुधारण्यासाठी शहरी भागाकडे वळत आहेत. जर गुरुजींनी आत्मपरीक्षण करीत शैक्षणिक दर्जात सुधारणा केल्यास ग्रामीण शिक्षणाला लागलेली गळती थांबण्यास नक्कीच मदत होईल, अशी प्रतिक्रिया सोयगाव तालुक्यातील नागरिकांत व पालकात दिसून येत आहे.


महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# महाजनसंपर्क अभियानाची खुलताबाद येथे सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** ३० मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाला ९ वर्ष पुर्ण झाले असून ३० मे ते ३० जुन रोजी भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांच्या नेतृत्वात देशभर लोकसभा मतदार संघामध्ये विशेष जनसंपर्क अभियान राबवण्यात येत असून या अभियानाची सुरुवात खुलताबाद तालुक्यात आ प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व लोकप्रतिनिधि व पदाधिकारी, शक्ति केंद्र प्रमुख व बूथ प्रमुख यांच्या सहकार्याने प्रत्येक गावात नरेंद्र मोदी यांच्या कार्यांचा जनते साठी राबवण्यात आलेल्या योजनांचा काम ३० मे ते ३० जुन या कालावधित करण्यात येत आहे यासाठी खुलताबाद तालुक्यामध्ये नियोजन करण्यात आले असून प्रथम या अभियानाची सुरुवात बाजार सावंगी येथे अभियान रैली काढण्यात आली व २ जुन रोजी पत्रकार परिषदेचे आयोजन करून ही संपूर्ण माहिती जनतेपर्यंत प्रसार माध्यमातून पोचवावी यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर बुद्धीवंताचे आयोजन, सोशल मिडिया प्रभावशाली व्यक्तिंचा मेळावा, व्यापारी सम्मेलन, विकासतीर्थ, ज्येष्ठ कार्यकर्ता समवेत स्नेह भोजन व संवाद, संयुक्त मोर्चा सम्मेलन, मतदार संघामध्ये लाभार्थी यांचे सम्मेलन, २१ जुन रोजी अंतराष्ट्रीय योग दिवस, २३ जुन रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची व्हिडिओ कॉन्फ्रेंस द्वारे १० बूथ वर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे २० जुन ३० जुन या कालावधित भाजपा चे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ति केंद्र प्रमुख, बूथ प्रमुख हे नरेंद्र मोदी यांनी राबवलेल्या सर्व योजनांची माहिती पॉम्पलेट द्वारे प्रत्येक घरामध्ये पोचवण्याचे काम करणार आहे या कामांची विभागणी तालुकस्तरीय कार्यसमिति चे नेमनुक करून संयोजक सह संयोजक व सदस्य अशी रचना संपूर्ण खुलताबाद तालुक्यामध्ये लागलेली आहे. या पत्रकार परिषदेस जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वर नलावडे, तालुका अध्यक्ष प्रकाश वाकळे, शहर अध्यक्ष तथा अभियानाचे समन्वयक सतीश दांडेकर, माजी उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, माजी उपसभापति दिनेश अंभोरे, युवामोर्चा जिल्हा उपाध्यक्ष संदीप निकम, तालुका सरचिटणीस अविनाश कुलकर्णी, यांनी पत्रकार परिषद घेऊन ३० मे ते ३० जुन पर्यंत मोदी @ 9 ची माहीती दिली.



# त्रिवेणी कांबळे यांचा मरणोत्तर देहदानाचा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगरः** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कार्यशाळेत मोटार मेकॅनिकपदावर कार्यरत असलेल्या त्रिवेणी कांबळे यांनी महामंडळाच्या अमृत महोत्सवानिमित्त मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला आहे. मरणोत्तर देहदानाचे संकल्पपत्र त्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या (घाटी) शरीररचनाशास्त्र विभागात लिहून दिले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या स्थापनेला १ जून रोजी ७५ वर्षे झाली आहेत. बहुजन हिताय बहुजन सुखाय असे ब्रीद घेऊन महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या सेवेत उतरलेल्या एसटी महामंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील विभागीय कार्यशाळेत मोटार मेकॅनिकपदावर कार्यरत असलेल्या त्रिवेणी कांबळे यांनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प सोडला आहे. त्रिवेणी कांबळे या मोटार मेकॅनिकपदाची जबाबदारी सांभाळतच गेल्या पाच वर्षांपासून महिला बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे कामही करत आहेत. या बचत गटांच्या माध्यमांतून त्यांनी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच सामाजिक प्रबोधनाचे उपक्रमही राबवले आहेत. व्यसनमुक्ती, अवयदान, वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर आणि समाजातील अनिष्ट प्रथांच्या विरोधात जागृती असे विविध उपक्रम त्या महिला बचत गटाच्या माध्यमातून राबवत आहेत. सामाजिक कार्य करत असतानाच केवळ भाषणे किंवा उपदेशाचे डोस न पाजता स्वतःच्या कृतीतून समाजासमोर आदर्श घालून देण्यासाठी त्रिवेणी कांबळे यांनी स्वतःच पुढाकार घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वतः मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला आहे. तसे संकल्पपत्र त्यांनी १ जून रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या शरीररचनाशास्त्र विभागात लिहून दिले आहे. आपल्या मृत्यूनंतरही आपले शरीर व अवयवांचा वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना संशोधन व अभ्यासासाठी फायदा व्हावा आणि गरजूंना आपले अवयवय कामी यावेत, या हेतूने त्रिवेणी कांबळे यांनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला आहे. महामंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्रिवेणी कांबळे यांनी केलेल्या मरणोत्तर देहदानाच्या संकल्पाबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# ट्रेलर- दुचाकीच्या धडकेत महिला ठार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रेलरने दुचाकीला धडक दिल्याने पत्नी ठार तर पती व मावस देर जखमी झाल्याची घटना धुळे -सोलापूर



महामार्गांवरील अंबड तालुक्यातील वडीगोद्री टी पॉईट वरील उड्डाणपुला जवळ दि. 2 जून रोजी दुपारी 12 वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात आश्विनी अनिकेत कादगे वय 22 रा. रुई धानोरा ता. गेवराई ही नवविवाहित महिला जागीच ठार झाली. तर अनिकेत हनुमंत कादगे वय 28 रा. रुई धानोरा ता. गेवराई व प्रमोद नामदेव घाटे वय 22 हे दोघे जखमी झाले. विदर्भातील देऊळगावराजा येथील 1 जून रोजी असणारे लग्न आवरून दि 2 जून रोजी सकाळी दुचाकी क्र. एमएच 23 बी जी 6521 दुचाकीने पती पत्नी व मावस देर रुई धानोरा येथे जात असतांना छत्रपती संभाजीनगर कडून बीड कडे जाणाऱ्या भरधाव ट्रेलर क्रमांक जी जे 36 एक्स 3333 ने धुळे -सोलापूर महामार्गांवर अंबड तालुक्यातील वडीगोद्री टी पॉईंट जवळ ट्रक ट्रेलरने दाम्पत्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत पत्नी ठार झाली तर पती व मावस देर हे दोघे जखमी झाले आहे. या अपघाताची माहिती कळताच घटनास्थळी वडीगोद्री येथील गावाकऱ्यांनी धाव घेत मदत केली. धडक देऊन पळून जाणाऱ्या ट्रक ला पकडून चालकाला पोलिसाच्या ताब्यात दिले. या घटनेची माहिती कळताच महामार्ग 52 चे मदतनीस व रुग्ण वाहिका यांनी येऊन मयत महिलेच प्रेत शवविच्छेदनासाठी वडीगोद्री प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले आहे.घटनेनंतर गोंदी पोलिसांनी ट्रक ट्रेलर ताब्यात घेऊन शहागड चौकी येथे नेण्यात आला असून ट्रक ट्रेलर चालकासही ताब्यात घेण्यात आले आहे. वाहतूक पोलिस यांनी येऊन वाहतूक सुरळीत केली आहे.वडीगोद्री प्राथमिक आरोग्य केंद्र येथे मयत आश्विनी कादगे यांचे शव विच्छेदन करून शव नातेवाईकांच्या ताब्यात दिले.

# हज यात्रेकरूंचा आ.विजय भांबळे यांच्या हस्ते सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील हज यात्रेकरू यांचा सत्कार आज रोजी मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांच्या हस्ते टी.जे.फंक्शन हॉल जिंतूर येथे करण्यात आला. मुस्लिम बांधवांचे सर्वात पवित्र तीर्थ स्थान काबा हे मक्का मदिना या शहरात असून तेथे लाखो भाविक हज यात्रेसाठी उत्सुक असतात. त्यात दरवर्षी अनेक तीर्थ यात्रेकरू हज यात्रेकरिता रवाना होतात. जिंतूर येथे नेहमी प्रमाणे याही वर्षी मा.आ.विजयराव भांबळे यांच्या हस्ते हजला जाणाऱ्या यात्रेकरूंचा सत्कार शहरातील प्रमुख मान्यवर मौलाना जलील साहेब, मौलाना तजमुल्ल साहेब, मौलाना रसूल साहेब, मौलाना सिराज साहेब, मौलाना रशीद साहेब यांच्या उपस्थितीत जिंतूर शहरातील हज यात्रेकरू सय्यद हसम आली, सय्यद साबेर सय्यद मुसा, मोहम्मद याकुब कुरेशी, शेख काल्लुद्दिन हुसेन, अखिल खान खयुम खान, शेख आली शेख बुढन, पठाण होसीन खान, फयाज अहेमद, शेख रहीम ननु, सय्यद मुकरब आली, सय्यद चांदपाषा, बिस्मिल्ला खान, नाजेर खां पठाण, शेख आली कुरेशी तर चारठाणा येथील शेख नासर शेख आमीन इ. चा सत्कार पार पडला. यावेळी मौलाना रसूल साहेब यांनी आपले मत व्यक्त करताना हज यात्रेकरूंचा प्रवास सुखाचा होओ अशी सदिच्छा व्यक्त केली तर सध्याच्या युगात देशात धर्माधर्मात तेढ निर्माण करून राजकीय पोळी भाजली जात आहे, अनेक राजकीय लोक धर्माच्या नावावर राजकारण करत असून जातीय दंगली घडऊ पाहत आहेत अशा लोकांना आपण वेळीच ओळखले पाहिजे आणि सामाजिक सलोखा राखणाऱ्या व्यक्तीच्या पाठीमागे राहिले पाहिजे असे मत व्यक्त केले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर